www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : २७ रविवार दि. ०५ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# राज्यातील सर्व संवर्गातील सेवा प्रवेश नियमांत सुधारणा करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्य शासनाच्या प्रत्येक संवर्गातील पदे आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये कालानुरूप मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे, हे लक्षात घेऊन राज्यातील सर्व संवर्गातील पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यात येणार आहे, असे सांगून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पदभरती प्रक्रिया गतीशील करून २०२६ या वर्षात मोठ्या प्रमाणात पदभरती करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. शासकीय सेवेत आज नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांनी लोकाभिमुख आणि पारदर्शी पद्धतीने आपले काम करावे असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सामान्य प्रशासन विभागातर्फे अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील १० हजार ३०९ उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरणाच्या




राज्य रोजगार मेळाव्याच्या राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ व तापी व कोकण खोरे विकास महा.), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पणन, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार परिणय फुके, आमदार अबु आझमी, आमदार मनोज जामसुतकर, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, कोकण विभागीय आयुक्त विजयकुमार सुर्यवंशी, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार आदी मान्यवर उपस्थित होते.

**राज्य शासनाची संस्थात्मक बांधणी बळकट करणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन अधिक सक्षम आणि गतिशील करण्यासाठी शासनाने सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा, अनुकंपा तत्त्वावरील प्रलंबित प्रकरणांचे निराकरण तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पारदर्शक भरती प्रक्रिया राबविण्यावर भर दिला आहे. आयोगाची पदभरती प्रक्रिया गतीशील करण्यासाठी अपर मुख्य सचिव सामान्य प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून विविध राज्यांचा अभ्यास करून निर्णय घेणार आहोत. आतापर्यंत ८० टक्के अनुकंपा नियुक्त्या पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित प्रकरणे लवकरच निकाली काढण्यात येतील. राज्याचे प्रशासन हे संस्थात्मकदृष्ट्या बळकट करण्याबरोबरच ते गतिशील, संवेदनशील आणि लोकाभिमुख करण्यास प्राधान्य दिले असून यासाठी १०० दिवसांचा आणि नंतर १५० दिवसांचा कार्यक्रम घेतला. यातून अनेक सुधारणा करता आल्या. अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी सामान्य प्रशासन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर मोठे बदल सुरू केले, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



राज्य स्तरीय शोळोय कुस्ती क्रिडा स्पर्धा २०२५ *कु स्वराज बाळाराम पाटील याने मुंबई विभागातून १४ वर्षीय गट मधून *प्रथम* क्रमांक मिळवून राज्य स्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्या बद्दल त्याच्यावर परिसरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे
( दैनिक युवक आधार )

## पूरग्रस्तांसाठी 25 हजारांचा धनादेश



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये पुराने थैमान मानले आहे. अनेक शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान या पुरामुळे झाले आहे. त्यांना मदतीचा हात देण्यासाठी अनेक संघटना सरसावल्या आहेत. नवीन पनवेल येथील ओम साई कलावंत मित्र मंडळातर्फे पूरग्रस्तांसाठी 25 हजारांचा धनादेश देण्यात आला आहे.

पनवेलचे उपविभागीय अधिकारी तथा प्रांत अधिकारी पवन चांडक यांना ओम साई कलावंत मित्र मंडळ तर्फे पूरग्रस्तांसाठी 25 हजारांचा धनादेश देण्यात आला. यावेळी मंडळाचे सल्लागार व पनवेलचे माजी नगराध्यक्ष संदीप भरत पाटील, मंडळाचे अध्यक्ष हे हेमंत पुजारा व कार्याध्यक्ष नितीन चोरघे उपस्थित होते.



जय हनुमान मित्र मंडळ व रुक्मिणी महिला मंडळ- आकुर्ली माळीवाडी, पनवेल.
शुभेच्छुक - श्री सचिनशेठ पदमाकर पाटील, सरपंच- आकुर्ली माळीवाडी.
( दैनिक युवक आधार )

## शासकीय सेवेत नव्याने आलेल्यांनी शासन आणि जनता यामधील दूवा म्हणून काम करावे – पालकमंत्री शंभूराज देसाई

**दैनिक युवक आधार / सातारा :** शासन गतिमान आहे. प्रशासकीय कामकाज गतिमान करणे हे आपल्या सर्वांचे ध्येय आहे. शासनाच्या धोरणाने अंत्यंत सुलभपणे आपल्याला शासकीय सेवेमध्ये नियुक्ती मिळाली आहे याची जाणीव ठेवून चांगले काम करा, शासनाच्या कल्याणकारी ध्येय धोरणांचा सर्वसामान्य घटकांना सकारात्मक दृष्टीकोन ठेवून लाभ मिळवून द्या. शासन आणि जनता यामधला दुवा म्हणून काम करा. पालकमंत्री म्हणून मी सदैव तुमच्या पाठीशी राहिन, अशी ग्वाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा व जिल्हा प्रशासन यांच्यावतीने अनुकंपा उमेदवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे लिपिक टंकलेखक पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण कार्यक्रम पालकमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षेतेखाली स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृह सातारा येथे झाला.यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्यकार्यकारी अधिकारी याशनी नागराज, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, तहसीलदार शशिकांत जाधव आदी उपस्थित होते.

पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, गतिमान प्रशासनाला आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले पाहिजे हे लक्षात घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शासनातील रिक्त असणारी पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानूसार 17 जुलै 2024



रोजी अनुकंपा भरतीचा अत्यंत सुटसुटीत असा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती राधा यांनी तयार केला. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. सातारा जिल्ह्यातही आपण ही सर्व प्रक्रिया पूर्ण करुन अनुकंपा धोरणानुसार 172 आणि उर्वरित महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील अशा जवळपास 248 नियुक्त्या दिल्या आहेत. नियुक्त झालेल्या उमेदवारांना उद्देशून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, ज्याप्रमाणे तुम्हाला अत्यंत सुलभ् व सुटसुटीत पध्दतीने शासकीय नोकरी मिळाली आहे. याची जाणीव ठेवून लोकांसाठी, समाजातील सर्व घटकांसाठी तत्परतेने काम करा. आपण शासकीय नोकरीत कसे आलो आहे याची जाणीव ठेवून संपूर्ण सेवा काळात लोकांनाही अशाच सुलभ व जलदगतीने सेवा द्या. आपण जनतेचे सेवक आहोत याची जाणीव ठेवा. माझी शाळा आर्दश शाळा, गतिमान प्रशासन स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र अशा अनेक उपक्रमांमध्ये सातारा जिल्हा राज्यात अग्रेसर आहे. यापुढेही जिल्ह्याचा नाव लौकीक वाढविण्यासाठी सकारात्मक पध्दतीने तुमची उर्जा शासकीय सेवेमध्ये पणाला लावा आणि काम करा.

## नियुक्त उमेदवारांनी शासनाचा व जनतेचा विश्वास संपादन करावा – पालकमंत्री चंद्रकांत पाटील

### जिल्ह्यात अनुकंपा व लिपिक भरती नियुक्तीच्या १३९ आदेशांचे वितरण

**दैनिक युवक आधार/ सांगली :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत लिपिक टंकलेखक पदासाठी निवड झालेल्या तसेच अनुकंपा तत्त्वावर आज नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आलेल्या उमेदवारांनी प्रामाणिकपणे व जबाबदारीने लोकाभिमुख काम करून शासनाचा व जनतेचा विश्वास संपादन करावा, असे मार्गदर्शन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज केले.

राज्य शासनाकडून महाराष्ट्रात एकाच दिवशी दहा हजारहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र वाटप अंतर्गत राज्य रोजगार मेळाव्याच्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून दूरदृश्यप्रणालीद्वारे ते बोलत होते. जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित या कार्यक्रमास आमदार सर्वश्री सदाभाऊ खोत, डॉ. सुरेश खाडे आणि सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.नियुक्त उमेदवारांचे अभिनंदन करुन, शासकीय सेवेत त्यांचे स्वागत करून व चांगल्या कामासाठी त्यांना शुभेच्छा देऊन पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यात एकाच दिवशी एकाच वेळी दहा हजारहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याचा राज्य शासनाचा हा महारोजगार मेळावा असून, असा कार्यक्रम राज्याच्या इतिहासात प्रथम होत आहे. शासनाच्या 150 दिवसाच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमातून या कार्यक्रमाला गती मिळाली. यासाठी जिल्हाधिकारी यांना अधिकार दिले आहेत. यापुढेही प्रतीक्षासूची व



रिक्त पदे यांचा वेळोवेळी आढावा घेऊ व अनुकंपा प्रवर्गातील उमेदवारांना न्याय देऊन शासकीय संस्थांचे बळकटीकरण करू. ही प्रक्रिया गतीने करण्यात येईल. ज्या तत्परतेने या नियुक्त्या करण्यात आल्या, त्याच तत्परतेने उमेदवारांनीही जबाबदारीने, शिस्तीने व प्रामाणिकपणे लोकाभिमुख काम करावे, असे त्यांनी सूचित केले.यावेळी अनुकंपा तत्त्वावर गट क व गट ड मध्ये प्रत्येकी 39 व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या 61 अशा 139 उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. शासकीय सेवेत असताना दुर्दैवाने मृत्यू झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.यावेळी आमदार सुधीर गाडगीळ यांनी हा राज्य शासनाचा चांगला उपक्रम असून, यातून नियुक्त झालेल्या उमेदवारांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, राज्य शासनाच्या सेवेत आज दाखल झालेल्या उमेदवारांनी आपण शासन व जनता यातील दुवा म्हणून काम करणार आहोत, याची जाणिव कायम ठेवावी. शासकीय कामकाजात शासनाचे धोरण व कायद्याची अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे कार्यालयीन शिस्त, प्रामाणिकपणा यातून तुमच्या कामात सकारात्मक प्रतिबिंब उमटवा.

## रयत शिक्षण संस्थेचे १०६ वर्धापन दिन जासई हायस्कूलमध्ये साजरा करण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

१०६ वर्षांपूर्वी शिक्षण महर्षी डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज त्या संस्थेला १०६ वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज जासई या विद्यालयाच्या प्रांगणात रयत शिक्षण संस्थेचे वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी कर्मवीरांना व रयत माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन केले तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम आणि सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील





प्रतिमांचे पूजन केले. कर्मवीरांना विषयी माहिती सांगण्यासाठी विद्यालयातील इयत्ता सातवी ब ची विद्यार्थिनी आरती गलांडे, सातवीची विद्यार्थिनी वैष्णवी राजगे, आठवी अ ची विद्यार्थिनी सानवी घरत, यांनी रयत शिक्षण संस्थेची व कर्मवीरांची महती मुलांना सांगितली. तसेच अध्यक्षीय भाषणात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम यांनी मुलांना कर्मवीरांना यांनी प्रतिकूल परिस्थिती त्यावेळी तळागाळातील लोकांना शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यांपर्यंत खेड्यापाड्यातील झोपडी झोपडी पर्यंत व झोपडी झोपडीतील माणसांपर्यंत कशी वाहून नेली याविषयी माहिती सांगितली. पूर्वीच्या काळी जातीभेद कसा होता आणि त्यावेळची परिस्थिती याविषयी माहिती सांगितली, तसेच अशा परिस्थितीत देखील कर्मवीरांनी सर्वांना शिक्षण मिळण्यासाठी कोणते प्रयत्न केले ,याविषयी सर्व माहिती अध्यक्ष भाषणात दिली कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेच्या पर्यवेक्षिका सौ म्हात्रे मॅडम यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या उपशिक्षिका सौ वर्तक डी आर मॅडम यांनी केले.

## पोटात अन्नाचा कण गेला नाही तरी चालेल परंतु डोक्यात आंबेडकरी साहित्य पाहिजे : मोहिनी बारमासे

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

**नागपूर :** रिपब्लिकन विद्यार्थी संघटना नागपूर यांच्यावतीने आयोजित कार्यक्रम लक्ष्मी नगर चौकात, जगात आपण पाहिले असाल मन्नत, मोक्ष, पाप पुण्य, धन पुत्र प्राप्तीसाठी तिर्थक्षेत्र परंतू नागपूरच्या पवित्र दिक्षाभुमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावन स्पर्शाने विज्ञानाची पंढरी दरवर्षी लाखो लोकांच्या साक्षीने भरत असते या परिवर्तनाच्या सोहळ्यात पुजा अर्चना न करता पुस्तकाचे गाठोडे घेऊन हा समाज परतीच्या वाटेवर निघतो हि जगाच्या पाठीवर मोठी क्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली अन्नाचा कण पोटात नाही गेला तरी चालेल पण डोक्यात आंबेडकरी साहित्य पाहिजे असे प्रतिपादन किताबे रोशन बारमासे यांनी केले ते आज दिक्षाभुमी येथे आंबेडकरी साहित्य वाटप करतांना बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे, धम्म नायक रवीभाऊ शेंडे, रिपब्लिकन नेते दिनेश बनसोड, आंरिमो चे राष्ट्रीय संघटक



देवेंद्र बागडे, आदेश बागेश्वर, विक्रम भारद्वाज, दिपक उमरे, एड.मिलिंद खोब्रागडे, प्रा. राहुल मून, सुमित बंसोड, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक सुधीर वासनिक, सुधिर मोटघरे, धर्माजी बागडे, प्रा. रमेश दुपारे हे होते. याप्रसंगी जगातील विचारवंत साहित्यिक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणाचे, भारतीय संविधान, बौद्ध धम्म, अण्णाभाऊ साठे, यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे वाटप मोफत करण्यात आले. या उपक्रमाला उपासक उपासिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. २५ हजार साहित्याचे वाटप करण्यात आले नागरीकांनी सकाळ पासूनच लांबलचक लाईन लावून ठेवली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला सुप्रसिद्ध कवी तन्हा नागपूरी यांनी पुष्पहार अर्पण केले तर नामदेवराव निकोसे यांनी दिपप्रज्वलन केले.

कार्यक्रमाला प्रकाश कांबळे, अँड सुरेश घाटे, सुखदेवराव मेश्राम, हंसराज उरकुडे, संजय मोटघरे, दिनेश पेंशने, गबरूवान, सह बारमासे परिवार उपस्थित होते. असे विजय वानखेडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# "संघाचे शताब्दी वर्ष : रेशीमबाग म्हणजे राष्ट्रभक्तीचे विद्यापीठ – प्रा. मोरे"





**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

नागपूर – नागपूर येथील रेशीमबाग म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील स्वयंसेवकासाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन भाजपा अनुजाती मोर्चा राज्य सचिव प्रा. संजय मोरे (अण्णा) यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेला दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शताब्दी वर्षानिमित्ताने भाजपा अनुजाती मोर्चा महाराष्ट्र राज्याचे सचिव तथा अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया, मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन सर्व शक्ती सेना (सामाजिक संघटना)चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रा. संजय मोरे यांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र निंभोरा येथे सफरचंद, केळी, पार्ले बिस्कीट (फळे) वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसरपंच ह.भ.प. सुभाष महाराज पाटील होते. तर विशेष अतिथी म्हणून प्रा. संजय मोरे व डॉ. निरज पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर मनोगत व्यक्त करताना प्रा. मोरे म्हणाले की, "नागपूर येथील रेशीमबाग म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील स्वयंसेवकासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक दीपस्तंभ असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे केवळ एक संघटन नसून मातृभूमीप्रती अखंड



निष्ठा, त्याग आणि राष्ट्रसेवेचा जीवनमंत्र देणारे एक अद्वितीय विद्यापीठ आहे. जे आम्हाला राष्ट्रभक्तीचे तेज, सेवाकार्यासाठी ऊर्जा आणि व्यक्तिमत्व विकासासाठी आत्मबल पुरवते. म्हणूनच संघाचा सेवक असणे ही अभिमानाची बाब आहे. या विद्यापीठात घडलेल्या प्रत्येक स्वयंसेवकासाठी नागपूर येथील रेशीमबाग हे चिरंतर दीपस्तंभ आहे."

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना संस्थापक आणि आद्य सरसंघचालक श्रध्देय डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी २७ सप्टेंबर १९२५ रोजी विजयादशमीच्या शुभदिनी केली. ते १९३१ ते १९४० या काळात सरसंघचालक होते. त्यांच्या नंतर द्वितीय सरसंघचालक प.पू. माधवराव सदाशिवराव गोळवलकर (गुरुजी) १९४० ते १९७३ या काळात होते. गुरुजींच्या विचारांमुळे, त्यागामुळे आणि दूरदृष्टीमुळे मनामनात प्रज्वलित झालेली राष्ट्रसेवेची ज्योत आजही अखंड तेवत असून येणाऱ्या अनेक पिढ्यांना ती मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादनही प्रा. मोरे यांनी केले.

या वेळी कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी डॉ. निरज पाटील, वैद्यकीय अधिकारी आर. के. पाटील, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, भाजपा नेते विजय सोनार, ज्ञानदेव नेमाडे, रवींद्र बारी, विवेक अजलसोडे, विनीत प्रजापती, अभय भालेराव, विष्णु पाटील, लोकेश पाटील, मोहन चौधरी, प्रथमेश पाटील, आरोग्य सहाय्यिका रामावत सिस्टर, श्री. जबडे, आरोग्य सहाय्यक श्रीरनामे, सिस्टर श्रीमती कोळंबे मॅडम, श्रीमती शिंपी मॅडम तसेच दवाखान्यातील रुग्ण व संपूर्ण स्टाफ उपस्थित होता.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आर. के. पाटील यांनी केले.

## महेंद्रशेठ घरत यांचा आज मुंबईत सत्कार!



**दैनिक युवक आधार**
**उलवे,प्रतिनिधी**

मैत्री संस्था व युवा सामाजिक प्रतिष्ठान आयोजित 'राष्ट्रपिता महात्मा गांधी सदभावना समाजभूषण' पुरस्काराने आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचा सत्कार करण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा रविवारी (ता.५) मुंबईतील प्रेस क्लब येथील सभागृहात सायंकाळी ५.४५ वाजता होणार आहे. माजी पोलिस महासंचालक सुधाकर सुराडकर यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उदघाटन होणार आहे. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत महेंद्रशेठ घरत यांचा सत्कार सोहळा पार पडणार आहे.

## महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते दसऱ्याला क्रिकेट पर्वाचा शुभारंभ!



**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर**

सिनीयर क्रिकेट क्लब पनवेल आणि अर्ली मार्निंग क्लब, चिंचपाडा या संघांच्या क्रिकेट पर्वाचा शुभारंभ गुरुवारी दसऱ्याला आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि सिनीयर क्रिकेट क्लब, पनवेलचे कर्णधार महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते झाला. यावेळी दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांना हस्तांदोलन करून क्रिकेट पर्वाचा आनंद घेतला.

प्रत्येक शनिवारी आणि रविवारी बहुतांश वेळा महेंद्रशेठ पनवेल महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी आठला क्रिकेट खेळण्यासाठी हजर असतात. अपवाद असतो ते विदेशात दौऱ्यावर असल्यास. काटेकोर वेळेचे व्यवस्थापन करण्यात महेंद्रशेठ घरत यांचा हातखंडा आहे. म्हणूनच ते आज अनेक क्षेत्रांत लीलया वावरू शकतात.

**राजकारणातला राजहंस!**

माणसाचा आहार-विहार कसा आहे, त्यावर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात. महेंद्रशेठ घरत हे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष असले तरी क्रिकेट, वाचन, लेखन, ट्रेकिंग, गायनाची त्यांना प्रचंड आवड आहे. वेळात वेळ काढून ते हे सर्व छंद जोपासतात. म्हणूनच ते हजरजबाबीही आहेत. म्हणूनच त्यांना राजकारणातील राजहंस म्हणतात.

## कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन



**दैनिक युवक आधार**
**उलवे, प्रतिनिधी**

कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली खालापूर तालुका आणि खोपोली शहर कॉंग्रेस कमिटीची आढावा बैठक शुक्रवारी (ता. ३) खोपोली येथे पार पडली. तिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "मलाही अनेक राजकीय पक्षांच्या ऑफर्स आल्या, पण सर्व नाकारल्या आणि कॉंग्रेसच्या विचारांशी ठाम राहिलो. आता ज्यांना निवडणूक लढवायची आहे त्यांनी आत्मविश्वास वाढवा आणि लोकांपर्यंत जा. कॉंग्रेसचा हात सबके साथ, हे सर्वसामान्यांना पटवून द्या."

यावेळी झालेल्या चर्चेत अनेक कार्यकर्त्यांनी सांगितले की, सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करून तरुणांना पक्षाशी जोडावे लागेल, यंदा खोपोलीमधून सात ते आठ नगरसेवक निवडून येऊ शकतात, अशीही आशा यावेळी व्यक्त केली गेली.

या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष निखिल ढवळे, खोपोली शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन, खालापूर तालुका अध्यक्ष देविदास म्हात्रे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## लायन्स आणि लिओ क्लब ऑफ द्रोणागिरी तर्फे वंचित मुलांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

उरण : लायन्स आणि लिओ क्लब ऑफ द्रोणागिरी यांच्या वतीने त्रिलोचन आय केअर, उरण येथे वंचित मुलांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश मुलांमधील डोळ्यांचे आजार ओळखणे व त्यावर लवकर उपाययोजना करणे हा होता. या शिबिराचे मार्गदर्शन सौ. प्रेरणा पाटील व श्री. सुमेध पाटील, (मालक, त्रिलोचन आय केअर) यांनी केले. त्यांनी मुलांची मशिन टेस्टिंग, सविस्तर तपासणी तसेच डोळ्यांशी संबंधित समस्या असलेल्या मुलांना योग्य मार्गदर्शन केले. तसेच, आगामी काळात आवश्यक त्या मुलांना प्रगत उपचार आणि मोफत चष्मे उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

या सेवाकार्यात लायन भुमिका सिंह (अध्यक्ष), लायन मोनिका चौकर (सचिव), लायन सागर चौकर (माजी अध्यक्ष), लायन नम्रता पूंनकर, लिओ लायन चेतन भोईर यांची उपस्थिती लाभली. तसेच इतर अनेक सदस्य व समर्थकांनी या उपक्रमाला हातभार लावला.




## रसायनी कराडे येथील अतिरिक्त एमआयडीसी मधील इस्कॉन कंपनी मध्ये झालेल्या चोरीचा गुन्हा उघडकीस

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (आनंद पवार)**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मौजे कराडे गावाच्या हद्दीत असलेल्याअतिरिक्त एमआयडीसीत इस्कॉन कंपनीमध्ये २० मार्च २०२५रोजी कंपनीच्या आवारात घुसून अज्ञात चोरट्यांनी ५३ हजार ५०० रुपये किमतीची वायर व पाईप चोरी केली होती.याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात२० मार्च २०२५ रोजी ७०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५प्रमाणे सदर चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती.

सदर चोरीला गेलेला माल व आरोपींना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली होती.जवळपास सहा ते सात महिने उलटून गेल्यानंतर या तपासाची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना गोपनीय बातमीदारांमार्फत खात्रीलायक माहिती प्राप्त झाल्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने चोरीतील विधी संघर्षित बालकांना ताब्यात घेतल्यावर त्यांनी इस्कॉन कंपनीत चोरी केली असल्याची कबुली त्यांच्या पालकांच्या समक्ष दिली.

चोरी करणारे हे अल्पवयीन(विधी संघर्षित) बालक असून त्यांना ३ऑक्टोंबर २०२५ रोजी ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी रसायनी पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे,यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक लिंगप्पा सरगर,सहाय्यक फौजदार संदीप पाटील,प्रसाद पाटील, पोलीस हवालदार सुधीर मोरे,रवींद्र मुंडे यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली.

## पोलीस असल्याचे सांगत लुटणाऱ्या सहा जणांना अटक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पोलीस असल्याचे सांगत सोने आणि रोख रक्कम लुटणाऱ्या सहा जणांना पनवेल शहर पोलिसांनी १ ऑक्टोबर रोजी अटक केली. सागर धनाजी पाटील (राहणार गवसे, कोल्हापूर), सुधाकर भीमराव पाटील (राधानगरी, कोल्हापूर), केतन गजानन सुरवसे (सोनारसिद्धनगर, सांगली) भिकाजी सिताराम पाटील (शेळप, कोल्हापूर), सुनील शिवाजी शिंदे (लंगारपेट, सांगली) श्रीधर बापू घाडगे (आटपाडी, सांगली) अशी त्यांची नावे आहेत.

26 सप्टेंबर रोजी विराज शिरकांडे (राहणार करंजाडे) हे सागर, शुभम, केतन असे ब्रिजा गाडी क्रमांक एम एच 46 सीई 8115 या वाहनाने मुंबई झवेरी बाजार ते करंजाडे, पनवेल येत होते. करंजाडे रेल्वे फाटका जवळ सव्वा अकराच्या सुमारास आले असता चॉकलेटी रंगाच्या एर्टिगा कार सह थांबलेल्या इसमांनी पोलीस असल्याची बहाणा केला आणि त्यांच्याकडील सोने आणि रोख रक्कम चोरी करण्याच्या उद्देशाने कार अडवली. यावेळी अटल सेतूवरून १२० च्या स्पीडवरून येऊन गाडी थांबवण्यासाठी हात केला मात्र तुम्ही गाडी का थांबवली नाही असे बोलून त्यांनी चौघांना फायबर काठीने मारहाण केली. आणि गाडीतील सोने, रोख रक्कम, मोबाईल ठेवण्यासाठी असलेल्या बॅग व मोबाईल गाडीमध्ये ठेवून त्यांच्याकडील एर्टिगा कार मध्ये बसवले आणि अटल सेतूकडे जाणाऱ्या रस्त्याने घेऊन जाऊन गाडीत शिवीगाळ आणि मारहाण करून मोबाईल फोन, घड्याळ, रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतले. त्यानंतर रस्त्यावर सोडून ब्रिजा कार निर्मनुष्य ठिकाणी घेऊन जाऊन कार मध्ये असलेल्या बॅग, रोख रक्कम, सोने, मोबाईल असा एकूण 34 लाख 28 हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी यातील सहा जणांना अटक केली. पोलीस अधिक तपास करत आहेत.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.


daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# श्री साई सिद्धी सेवा संस्थेतर्फे भव्य साई भंडारा: गरबा-रासाने रंगला सोहळा















**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर मुंबई**
**विभाग प्रतिनिधी**

जोगेश्वरी (पूर्व) येथील जनता कॉलनी, गांधी नगर परिसरातील श्री साई सिद्धी मंदिरात दिनांक २ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री साई सिद्धी सेवा संस्था (संस्थापना १९९५) तर्फे भव्य साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. नवरात्रोत्सव व विजयादशमीच्या औचित्याने आयोजित या धार्मिक सोहळ्याला परिसरातील शेकडो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिवसभर मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी श्री साईची पूजा-अर्चा करून भक्तांना महाप्रसादाचे वितरण सुरू करण्यात आले. भाविकांच्या सोयीसाठी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सक्रिय राहून व्यवस्था पाहत होते. भक्तीभावाने उभारलेले मंडप, सजवलेला मंदिर परिसर आणि सतत चालणारे नामस्मरण यामुळे वातावरण अधिकच मंगलमय झाले होते.

भंडाऱ्यात महिला वर्गाने विशेष पुढाकार घेतला. त्यांनी मोठ्या उत्साहात भाकऱ्या करून भाविकांसाठी प्रसादाची तयारी केली. "दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हा भंडारा यशस्वी झाला असून भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभला. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात ऐक्य, परस्पर स्नेह व भक्तिभाव वृद्धिंगत होतो," असे संस्थेचे कार्यकर्ते सांगतात.

या प्रसंगी मा. नगरसेवक श्री भालचंद्र अंबुरे, सचिव- महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेना मुंबई विभाग निलेश खोत,श्री. शिरी रेडकर, राऊत,भारतीय जनता पार्टी श्री.सिताराम (बाळा) वाडेकर उत्तर पश्चिम जिल्हा सचिव ,घाडी,सुधीर फेदुरवार, कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्यासह स्थानिक समाजबांधवांनीही कार्यकर्त्यांना सहकार्य केले. संपूर्ण उपक्रमाचे श्रेय श्री साई सिद्धी सेवा संस्थेच्या अध्यक्ष महेंद्र केळकर, उपाध्यक्ष आदित्य जाधव, सचिव विवेक दळवी, खजिनदार प्रसाद (भाई) वेंगुर्लेकर, उपसचिव निखिल रांगणेकर आणि उपखजिनदार सुशांत राऊळ यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या पदाधिकारी व स्वयंसेवकांना जाते.कार्यक्रमाची सांगता संध्याकाळी रंगतदार गरबा-रासाने झाली. पारंपरिक पोशाख परिधान केलेल्या महिला व युवकांनी नवरात्रीच्या गाण्यांच्या तालावर उत्साहात नृत्य केले. भक्तिगीतांवर सजलेल्या या गरबा-रासामुळे मंदिर प्रांगणात उत्सवाचे स्वरूप लाभले. भाविकांनी भक्ती, आनंद व ऐक्याचा अद्भुत संगम अनुभवला.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ समाजकार्य आणि धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रिय असलेल्या श्री साई सिद्धी सेवा संस्थेने या भंडाऱ्याच्या माध्यमातून पुन्हा एकदा समाजात ऐक्य, भक्तिभाव आणि संस्कार जोपासण्याचे कार्य केले.

# नुकसान भरपाई पासून एकही शेतकरी वंचित राहू देऊ नका- शेतकरी नेते सुनील देवरे

**दैनिक युवक आधार**
**जळगाव आनंद पवार**

महाराष्ट्रासह जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यामध्ये गेल्या आठ दहा दिवसांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने कापूस,मक्का, सोयाबीन,ज्वारी,केळी या पिकांचे अतोनात असे नुकसान झालेले आहे या नुकसान भरपाईचे पंचनामे करतेवेळी कृषी आणि महसूल या विभागाच्या अधिकाऱ्यांवर वस्तुनिष्ठ पंचनामे करा म्हणजे काय तर आपल्या शेतामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे पाणी साचलेले असेल अशाच शेतकऱ्यांचा आम्ही पंचनामे करू असा अर्थ संबंधित पंचनामा करणाऱ्या अधिकाऱ्याने काढलेला दिसून येत आहे परंतु पाऊस जाऊन मोठा कालावधी लोटलेला आहे आणि सद्यस्थितीत कोणत्याही क्षेत्रामध्ये पाणी साचले दिसून येत नाही परंतु अतिवृष्टीमुळे कापसाचे बोंड सडून गेलेले आहेत जो थोडाफार माल झाडावरती शिल्लक होता तो गळून पडलेला आहे आणि झाड हे लाल झाले असून काही ठिकाणी कापूस हिरवागार दिसतो परंतु कापसाला लागलेला सर्व माल



गळून पडलेला आहे त्यामुळे त्याची ग्रोथ होईल असे कोणतेही परिस्थिती नाही.कापूस जास्तीत जास्त वीस दिवसाचे पीक शिल्लक राहिलेला आहे ही परिस्थिती त्या झाडाची झालेली आहे तरीही सरसकट पंचनामा करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या माध्यमाने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून आपण सरसकट पंचनामा करत नसाल तरी अडचण नाही परंतु ज्या शेतकऱ्यांच्या शेतात खरंच नुकसान झालेलं आहे त्या सर्व शेतकऱ्यांचा पंचनामा झाला पाहिजे.हेक्टरी ५०हजार रुपये नुकसान भरपाई शेतकऱ्याला मिळाली पाहिजे या मागणी करता महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष व शेतकरी नेते सुनील देवरे यांच्या नेतृत्वात पारोळा तहसीलचे तहसीलदार डॉ.उल्हास देवरे यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देते वेळी पारोळा तालुक्यातील शिवरे,आडगाव, तरवाडे परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले असून यावर शासन स्तरावरून योग्य ते प्रयत्न करण्यात यावे अशी चर्चा करण्यात आली असून तहसीलदारांनी नुकसान भरपाई व वन्य प्राण्यांच्या प्रश्नांसंदर्भात सकारात्मकता दाखवत शासन स्तरावरून दखल घेण्यात येईल असे आश्वासन दिले यावेळी निवेदनावर भुराजी कांडेकर,शिवाजी पाटील,नामदेव पाटील,महेंद्र पाटील, पिनू पाटील,भगवान पागरे,भगवान पाटील, नथू पाटील,संदेश पाटील,निंबा पाटील, विजय पाटील,महेंद्र पाटील,लखीचंद पाटील,दीपक पाटील, वसंत पाटील,सुभाष पाटील,दगा पाटील, कारभारी पाटील,योगेश पाटील,मच्छिंद्र पाटील, बन्सीलाल पाटील,संजू पाटील,राजेंद्र पाटील,श्याम पाटील,प्रवीण पाटील यांच्या स्वाक्षरी असून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# सहायक पोलीस आयुक्त,खारघर विभाग कार्यालयाचे उद्घाटन



**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत(कल्याण ग्रामिण)**

खारघर :नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात नव्या प्रशासकीय पुनर्रचनेनंतर सहायक पोलीस आयुक्त,खारघर विभाग या कार्यालयाचे उद्घाटन दि.३ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वा.करण्यात आले.महाराष्ट्र शासनाच्या दि.२३ जुलै २०२५ च्या निर्णयानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळांची पुनर्रचना करून परिमंडळ १ वाशी,परिमंडळ २ बेलापूर आणि परिमंडळ ३ पनवेल अशी नवी रचना करण्यात आली आहे.या परिमंडळ ३ मध्ये सहायक पोलीस आयुक्त, खारघर विभाग हे नवीन पद निर्माण करण्यात आले असून, खारघर, कामोठे, कळंबोली आणि तळोजा अशी चार पोलीस ठाण्यांची हद्द या विभागाला देण्यात आली आहे.

विक्रम कदम यांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी सहायक पोलीस आयुक्त, खारघर विभाग या पदाचा कार्यभार स्विकारला.त्यांच्या कार्यासाठी खारघर पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावर कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे.आज या कार्यालयाचे उद्धाटन पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते तर पोलीस सहआयुक्त संजय येनपूरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

## श्रीवर्धनमध्ये 'भूमीपुत्र श्रीवर्धन' संघटनेची दमदार वाटचाल – स्थानिक मुलांच्या रोजगार व व्यवसायासाठी पुढाकार


**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

स्थानिक मराठी युवकांना रोजगार आणि व्यवसाय क्षेत्रात संधी मिळावी, यासाठी 'भूमीपुत्र श्रीवर्धन' ही संघटना स्थापन करण्यात आली असून, अल्पावधीतच या संघटनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ४०० पेक्षा अधिक स्थानिक युवकांनी सभासद नोंदणी करून संघटनेवर विश्वास व्यक्त केला आहे.संघटनेचा प्रमुख उद्देश श्रीवर्धनमधील प्रत्येक उद्योग, व्यवसाय आणि प्रकल्पामध्ये स्थानिक भूमीपुत्रांना प्राधान्य मिळवून देणे हा आहे. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच स्वावलंबनाच्या दिशेने प्रेरित करण्यासाठी संघटना विविध स्तरांवर प्रयत्नशील आहे.लवकरच 'भूमीपुत्र श्रीवर्धन' संघटनेच्या विभागनिहाय सभा आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये स्थानिक प्रश्नांबरोबरच युवकांना शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन देण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहेत.संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, "श्रीवर्धनच्या मातीत जन्मलेल्या प्रत्येक तरुणाला आपल्या गावातच सन्मानाने काम करण्याची संधी मिळावी, हीच आमची लढाई आहे."'भूमीपुत्र श्रीवर्धन' ही संघटना आता स्थानिक अस्मिता आणि रोजगार हक्कासाठीचा आवाज बनत असून, येत्या काळात या संघटनेच्या माध्यमातून श्रीवर्धनच्या तरुणाईला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमींचे सर्वेक्षण करुन दुरुस्ती व अत्यावश्यक सुविधा द्या - माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमींचे सर्वेक्षण करुन दुरुस्ती व अत्यावश्यक सुविधा पुरवण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे.



माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी असलेल्या स्मशानभूमीची सद्यस्थिती अत्यंत जीर्ण झालेली आहे. दुरुस्ती अभावी तेथे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच, पिण्याचे पाणी, शेड, विद्युत दिवे, रस्ते, बसण्यासाठी बाकडे व स्वच्छतागृह अशा अत्यावश्यक सुविधा देखील अनेक ठिकाणी उपलब्ध नाहीत. त्यामुळे अंत्यविधी करीता येणाऱ्या नागरीकांना नादुरुस्त स्मशानभूमी व त्याठिकाणी असलेल्या अपुऱ्या सोयीसुविधांमुळे गैरसोयीस सामोरे जावे लागते. त्याठिकाणी आवश्यक सुविधा असणे ही महानगरपालिकेची नैतीक जबाबदारी आहे, असे निवेदनात नमूद करून पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमीची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, सर्व स्मशानभूमीमध्ये पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, शेड, बसण्यासाठी बाक, स्वच्छतागृहे इत्यादी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, स्मशानभूमी परिसर स्वच्छ व सुरक्षित राहिल यासाठी नियमित देखभाल व देखरेखीसाठी आवश्यकती यंत्रणा नेमण्याची व्यवस्था करण्यात यावी, स्मशानभूमी पर्यंत जाण्यासाठी योग्य व दुरुस्त असा रस्ता बनविण्यात यावी अशा सुविधा त्यांनी या निवेदनातून सुचविल्या असून या विषयाचे महत्वपूर्ण गांभिर्य लक्षात घेता पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमींची सर्वेक्षण करुन दुरुस्ती व अत्यावश्यक सुविधा पुरविण्याकरीता योग्य उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केली आहे.



## डॉ. संकेत महाजन यांचे किड नियंत्रणावर महत्वपुर्ण संशोधन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर - येथील डॉ संकेत शेखर महाजन या शेतकरी पुत्राने भात शे-तीतील किड नियंत्रणावर महत्त्वपूर्ण असे संशोधन केले असून त्यांच्या एकात्मिक किटक व्यवस्थापन मॉड्यूलमुळे शेतकऱ्यांना त्याचा थेट फायदा होणार आहे. डॉ. संकेत महाजन यांनी भात शेतीतील सखोल संशोधना बद्दल सॅम हिग्गीन बॉटम कृषी तंत्रज्ञान आणि विज्ञान विश्वविद्यालय प्रयागराज येथून नुकतीच पीएचडी पदवी संपादन केली आहे. त्यांनी सिंथेसिस अँड डेव्हलपमेंट ऑफ प्लान्ट प्रोटेक्शन मॉड्यूल फॉर देअर इफेक्टीव्हनेस अगेन्स्ट इनसेक्ट पेस्ट कॉम्प्लेक्स ऑफ प्याडी अंडर सेंट्रल प्लेन अँग्रो क्लायमेटीक झोन ऑफ उत्तर प्रदेश असा होता.

डॉ. महाजन यांनी भात शेतीत एकात्मिक किटक व्यवस्थापन प्रणा ली विकसित करण्यासाठी बीजप्रक्रिया ते काढणीपर्यंत विविध वनस्पती संरक्षण मॉड्यूलची निर्मिती केली. भारतातील भात हे प्रमुख अन्नधान्य असून देशाच्या अन्नसुरक्षेचा पाया या पिकावर आहे. परंतू गेल्या काही वर्षात बदलत्या हवामानामुळे व वाढत्या किड रोग प्रादुर्भावामुळे भात उत्पादनावर गंभीर संकट उभे राहिले आहे. बासमती व बहुगुणकारी काला नमक या जातींना होणाऱ्या किड प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. ही समस्या लक्षात घेऊन व चाचणी केली. सलग दोन वर्षे उत्तर प्रदेशा-तील मध्य मैदानी प्रदेशात प्रयोगात्मक प्रात्यक्षिके घेऊन या मॉड्यूलची कार्यक्षमता सिद्ध करण्यात आली. संशोधनामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होणार आहे.

प्रा. डॉ. अश्विनी कुमार, डॉ अनुराग तायडे, प्रा डॉ सुनिल झकारीया, प्रा. डॉ. अजित पौल यांचे मार्गदर्शन लाभले.

## दिग्रस तालुक्यातल असं एक गाव पिंपरी त्याच नाव शासकीय योजनेसाठी सावत्र वागणूक

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष पूर्ण होऊन.देश आजादी का सुवर्ण उत्सव साजरा करत असताना.दिग्रस शहरापासून २० कि.मी. अंतरावर पिंपरी डोल्हारी हे गाव आहे.हे गाव आदिवासी बहुल असून या गावाची लोकसंख्या जवळपास ५०० इतकी आहे. मात्र आजही आपल्या मूलभूत सुविधा व हक्कासाठी त्यांना मोठी कसरत करावी आहे.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार अनेक योजना राबवतात, ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य, आर्थिक कल्याण आणि पायाभूत सुविधांचा समावेश आहे. मात्र या योजना मिळवण्यासाठी गावातील लोकांना मोठी कसरत करावी लागत आहे. शासनाकडून मिळत असलेलं मोफत राशन बाजूच्या ५ कि.मी अंतरावर असलेल्या वडगाव येथून भाड्याने पैसे खर्च करून आणावं लागत. लोकांना मोफत मिळत असलेल राशन त्यासाठी त्यांना पैसे मोजावे लागत असल्याने. गावातील लोकांनी मोठी नाराजी व्यक्त केली आहे. गावाच्या विकासासाठी त्यांना पंचायत समिती दिग्रसशी जोडलं असलं तरी आर्णी पंचायत समिती येथील कोपरा गाव मिळून या गावाची गट ग्रामपंचायत आहे. मात्र याचा कागदोपत्री कुठेही उल्लेख नसल्याने शासनाकडून मिळणाऱ्या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यांचे अर्ज तुरटीत येतात त्यासाठी त्यांना सरपंच यांचे प्रमाणपत्र जोडावे लागतात असे गावकऱ्यांनी सांगितले आहे. हे गाव विविध कार्यकारी सोसायटीसाठी पंचायत समिती आर्णी येथील गावापासून १२ कि. मी. अंतरावर असणाऱ्या चिकणी (कसबा )या गावाशी जोडलेल आहे.गावात आरोग्याची कोणतीच सुविधा नाही. याबाबत गावाकऱ्यांनी मोठी खंत व्यक्त केली आहे. दिग्रस तालुक्यातील जनतेने भरभरून मतदान करून आमदार खासदार व मंत्री निवडून दिले. आता पिंपरी या गावाला स्वतंत्र गावाचा दर्जा मिळवून देऊन शासनाकडून मिळत असलेल्या त्यांच्या हक्काच्या योजना त्यांना गावातच मिळाव्या अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# नांदगावची सुकन्या कु .पल्लवी निकम ठरली - नवदुर्गा पुरस्काराची मानकरी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. सोमनाथ निकम यांची कन्या कुमारी पल्लवी ठरली नवदुर्गा पुरस्काराची मानकरी . क्रीडा सह्याद्री फाउंडेशन नाशिक - शारदीय नवरात्र महोत्सव निमित्त देण्यात येणाऱ्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो . नवदुर्गा पुरस्कार .कुमारी पल्लवी सोमनाथ निकम हिची या पुरस्कारासाठी निवड झालेली आहे .




कुमारी पल्लवी सोमनाथ निकम ही अगदी लहानपणापासूनच अभ्यासात जशी हुशार आहे .तशीच खेळातही एक आपलं अस्तित्व दाखविणारी विद्यार्थिनी आहे . इयत्ता पाचवी स्कॉलरशिप परीक्षा , आठवी स्कॉलरशिप , इयत्ता आठवी एन एम एम एस परीक्षा , एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा याही परीक्षांमध्ये तिने उत्तम असे यश संपादन केले आहे . तसेच अनेक वक्तृत्व स्पर्धांमध्येही तिने बक्षीस मिळवलेले आहेत . तसेच बेसबॉल या खेळामध्ये कुमारी पल्लवीची राज्यस्तरीय संघामध्ये निवड झालेली होती . तसेच सन 2025 या शैक्षणिक वर्षात कर्मवीर भाऊराव पाटील व विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय विंचूर या विद्यालयांमध्ये इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत तिने 92.60% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला होता आणि सध्या पल्लवी ही विंचूर महाविद्यालयात इयत्ता अकरावी सायन्स वर्गात शिक्षण घेत असून याच महाविद्यालयातून तिने वुडबॉल या खेळामध्ये सहभाग घेऊन 19 वर्षाखालील मुलींचा संघ विजयी झालेला असून विभागीय स्तरावर या संघाची निवड झालेली आहे . या मुलींच्या संघाचे कर्णधार अर्थात नेतृत्व देखील पल्लवी करीत आहे .

तिच्या कला क्रीडा व अभ्यास या सर्व गुणवत्तेचा विचार करून क्रीडा सह्याद्री फाउंडेशन नाशिक यांच्या वतीने दिला जाणारा सन 2025 चा नवदुर्गा पुरस्कारासाठी कुमारी पल्लवी सोमनाथ निकम हिची निवड झालेली आहे .अनेक मान्यवरांच्या हस्ते कुमारी पल्लवीचे शाल , श्रीफळ सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आलेला आहे .रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा .डॉक्टर सुजितजी गुंजाळ साहेब , तसेच रयत शिक्षण संस्था उत्तर विभाग सल्लागार समितीचे सदस्य मा . सुनीलजी मालपाणी साहेब , शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष मा . जगदिश जेऊघाले काका ,तसेच उपाध्यक्ष मा . कैलास सोनवणे साहेब , मा. अनिल दरेकर व सर्व सदस्य ; शाळा व्यवस्थापन समितीचेअध्यक्ष मा .राजेंद्र गोरे साहेब , गुरुकुल उपाध्यक्ष - दत्ता दरेकर , मा संदिप जोशी , मा . नानाभाऊ गाडे तसेच मा किशोर भाऊ दरेकर - व्हा . चेअरमन खरेदी - विक्री संघ लासलगाव व सर्व समिती सदस्य ; तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा . नंदकुमार देवढे उपप्राचार्य वाबळे सर ; लाईफ मेंबर रयत शिक्षण संस्था सातारा मा . चांदे सर , पर्यवेक्षक मा . माळी सर ,ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख मा . राजेंद्र टिळेकर , तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी तसेच वनसगाव विद्यालयाचे माजी प्राचार्य सी डी रोटे सर यांनी कुमारी पल्लवीचे खूप कौतुक व अभिनंदन केले आणि तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .

## जाहीर नोटिस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH2024-GP-4899K मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH48AG5216 व MH46CB6442 चे मालक कै.आर्य संतोष गायकवाड याचं दिनांक 24/08/2025 रोजी निधन झाले आहे.

मी,
शर्मिला संतोष गायकवाड.
विठ्ठल रुक्मिणी मंदिर जवळ, चिंचपाडा, पनवेल,रायगड, महाराष्ट्र - 410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**शर्मिला संतोष गायकवाड.**
**विठ्ठल रुकीमिनी मंदिर जवळ, चिंचपाडा, पनवेल,**
**रायगड,महाराष्ट्र,410206.**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शासकीय नोकर म्हणून नव्हे तर जनतेचे सेवक म्हणून काम करा – पालकमंत्री गुलाबराव पाटील

**दैनिक युवक आधार**

**जळगाव :** शासकीय नोकरीत रुजू होताना आपल्या मनात केवळ ‘नोकरी’ ही भावना न ठेवता ‘जनतेची सेवा’ हीच भावना ठेवा. शासकीय नोकर म्हणून नव्हे तर जनतेचे सेवक म्हणून काम करा,” असे भावनिक प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित अनुकंपा भरती २०२५ अंतर्गत गट क व गट ड संवर्गातील उमेदवार, महाराष्ट्र लोकसेवा आयोग अंतर्गत लिपिक टंकलेखक भरती २०२३ गट क या संवर्गातील उमेदवारांच्या नियुक्ती आदेशांचे वाटप कार्यक्रमात, उमेदवारांना मार्गदर्शन करतांना पालकमंत्री गुलाबराव पाटील बोलत होते.

यावेळी, खासदार स्मिता वाघ,आमदार सुरेश भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, अपर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण उपस्थित होते.

पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, तुमच्याकडे कामानिमित्त आलेल्या प्रत्येक नागरिकांशी चांगले वागा, तुम्ही जनतेचे सेवक आहात, जनतेची सेवा करा, तनावमुक्त वातावरणात उत्साहात आपली कर्तव्य पार पाडा, आपल्या कामासोबत आपल्या शरीराकडेही लक्ष द्या, तुमचा फिटनेस सांभाळा, आपलं काम प्रामाणिकपणे करा, नोकरीमुळे आता तुमची जबाबदारी वाढली आहे, तुमच्या कुटूंबाने संकटात, दुखात तुम्हाला घडविले, वाढविले, शिक्षण दिले, त्या कुटुबांचा सांभाळ करा, जनतेच्या सेवेतच देव आहे, असे माणून काम करत राहा. असे सांगत त्यांनी सर्व नवनियुक्त कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्यात.

खासदार स्मिता वाघ, आपल्या मनोगतात म्हणाल्या, नोकरी करतांना प्राणिकपणे काम करुन समाजाची सेवा करा, येणारी पिढी तुमचे कौतुक करेल असे काम करुन




दाखवा, नोकरीच्या निमित्ताने जनतेची सेवा करतांना त्यांनी तुम्हाला स्मरणात ठेवले पाहिजे, या उद्देशाने काम करत रहा, असे त्यांनी सांगितले.

आमदार श्री.भोळे यांनी राज्य शासनाने एकाच वेळी १० हजार उमेदवारांना नियुक्त्या दिल्याबद्दल सर्व मंत्रीमंडळाचे आभार व्यक्त करुन ते म्हणाले, सामजातील गरजू नागरिकांना नेहमीच सहकार्य करा, नोकरी करतांना जनतेचे आर्शिवाद मिळाले पाहिजे, या पध्दतीने काम करा.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, “सेवेत असताना समाजासाठी निस्वार्थपणे काम करा, समस्यांचे समाधान शोधण्याची क्षमता विकसित करा आणि कार्यक्षमतेत इतकी वाढ करा की अधिकारी स्वतः तुम्हाला शोधतील,” असे आवाहन, यांनी नवनियुक्त कर्मचाऱ्यांना केले, सर्वांनी आपले आरोग्य सांभाळत, संयमाने आणि प्रामाणिकपणे काम करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल, जिल्हा पोलिस अधिक्षक महेश्वर रेड्डी यांनी, आपल्या मनोगतात नवनियुक्त उमेदवारांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**३१३ उमेदवारांना नियुक्ती पत्रांचे वितरण**

शासनाच्या “१५० दिवसांच्या उपक्रमांतर्गत” अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेत गट ‘क’ संवर्गातील ४१, गट ‘ड’ संवर्गातील १४७ आणि एमपीएससी द्वारे शिफारस केलेले १२५ उमेदवार अशा एकूण ३१३ उमेदवारांना,शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेशांचे वितरण यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, आस्थापना विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

# नौदलाच्या पश्चिम विभाग प्रमुखपदी व्हाईस ॲडमिरल राहुल गोखले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** भारतीय नौदलाच्या पश्चिम विभागाच्या प्रमुखपदाचा कार्यभार व्हाईस ॲडमिरल राहुल विलास गोखले यांनी नुकताच स्वीकारला.

दिशादर्शन क्षेत्रातील तज्ज्ञ असलेल्या गोखले यांनी १ ऑक्टोबर रोजी या पदाचा कार्यभार स्वीकारला. गोखले हे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (खडकवासला), डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज (वेलिंग्टन), नेव्हल वॉर कॉलेज (गोवा) आणि ऑस्ट्रेलियन डिफेन्स कॉलेज (कॅनबेरा) या संस्थांचे माजी विद्यार्थी आहेत.

त्यांनी आपल्या कारकीर्दीत ‘आयएनएस कोरा’चे कार्यकारी अधिकारी आणि ‘आयएनएस खुर्की’ व ‘आयएनएस कोलकाता’चे कमांडिंग अधिकारी म्हणून काम केले आहे. तसेच त्यांनी



नौदलाच्या पूर्व विभागाचे परिचलन अधिकारी म्हणूनही काम केले.


त्यांनी इस्लामाबाद येथील भारतीय उच्चायोगात नौदल सल्लागार म्हणूनही सेवा दिली आहे.

# डीआरआयची मुंबई विमानतळावर मोठी कारवाई, दोन महिलांकडून ७९ कोटींचं कोकेन जप्त

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** डीआरआय मुंबईनं ड्रग्ज तस्करीचं एक मोठा रॅकेट उद्ध्वस्त केलंय. गुप्तचर विभागाला मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ७९ कोटी रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आलंय. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आलीय.

काय आहे प्रकरण? - डीआरआय मुंबईच्या विभागीय युनिटनं बँकॉकहून मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणाऱ्या दोन महिला प्रवाशांकडून बेकायदेशीरपणे तस्करीकरून आणलेलं ७.९५ किलो कोकेन जप्त करण्यात आलंय. ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत अंदाजे ७९.५ कोटी रुपये



इतकी आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बँकॉकहून मुंबईत आलेल्या दोन महिला प्रवाशांना डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावरच रोखलं. तिथं त्यांच्या सामानाची सविस्तर तपासणी केली असता खेळण्यांच्या पॅकेटमध्ये लपवून ठेवलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. खेळण्यांच्या बॉक्समध्ये पांढऱ्या पावडरीच्या तब्बल २२ विटांच्या आकाराची पॅकेट्स दडवून ठेवण्यात आली होती. ही सारी पॅकेट्स जप्त करून त्यांची जागेवरच प्राथमिक चाचणी करण्यात आली. एनडीपीएस फील्ड किटसह केलेल्या चाचणीत हा पदार्थ कोकेन असल्याची पुष्टी झाली.या प्रकरणात सखोल चौकशी सुरू - कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत या दोन्ही महिलांना एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत अटक करण्यात आली. या दोन्ही महिलांना कोर्टात हजर केलं असता कोर्टानं त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केलीय. डीआरआय याप्रकरणी अधिक तपास करीत असून, एक मोठं तस्करीचं रॅकेट कार्यरत असल्याचा तपास यंत्रणेला संशय आहे. प्राथमिक तपासातून हे प्रकरण आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करांच्या टोळीशी संबंधित असल्याचे निष्पन्न झालंय. अटक केलेल्या आरोपींच्या मोबाइलमधील माहितीत सीमाशुल्क अधिकाऱ्यांना अनेक पुरावे सापडलेत. त्यात काही परदेशी नागरिकांचाही समावेश असून, या संपूर्ण टोळीचा शोध सुरू आहे. दक्षिण अमेरिकेतून विविध मार्गांनी अमली पदार्थांचं जगभरात वितरण केलं जातं. गेल्या काही महिन्यांपासून भारतात बँकॉकमार्गे मोठ्या प्रमाणात ड्रग्जची तस्करी केली जात असल्याचं निदर्शनास आलंय.

# साई मंदिरात दहीहंडी फोडून चार दिवसीय पुण्यतिथी उत्सवाची सांगता; चार दिवसांत लाखो भाविकांनी घेतलं साईंचं दर्शन

**दैनिक युवक आधार**

**शिर्डी :** करोडो भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून लाखो भाविक दररोज शिर्डीत येतात. साईबाबा संस्थानच्या वतीनं साजरा करण्यात येत असलेल्या चार दिवसीय साईबाबा पुण्यतिथी (Shirdi Saibaba Death Anniversary) उत्सवाची आज गोपालकाल्याच्या कीर्तनानं दहीहंडी फोडून सांगता करण्यात आली. साईबाबा संस्थानच्या वतीनं १०७ वा साईबाबा पुण्यतिथी उत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या चार दिवसांच्या उत्सवात लाखो भाविकांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं.

दहीहंडी फोडून उत्सवाची सांगता : शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीनं साई मंदिरात परंपरागत गुरुपौर्णिमा, रामनवमी




आणि विजयादशमी असे तीन उत्सव साजरे होतात. त्यापैकी एक म्हणजे साईबाबा पुण्यतिथी अर्थात दसऱ्याचा उत्सव १ ऑक्टोबरच्या पहाटे काकड आरतीनं सुरू झाला होता. साई समाधी मंदिरात आकर्षक फुलांनी सजवलेली दहीहंडी बांधण्यात आली होती. साईंच्या मध्यान्ह आरतीपूर्वी साई संस्थान आणि मानकऱ्यांकडून दहीहंडी फोडत पुण्यतिथी उत्सवाची सांगता करण्यात आली.

तिथीप्रमाणे बाबांची पुण्यतिथी साजरी : साईबाबांनी १०७ वर्षांपूर्वी दसऱ्याच्या दिवशी दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी शिर्डीत आपला देह ठेवला. त्या दिवशी मंगळवार होता. १९९९ साली तिथीप्रमाणे बाबांची पहिली पुण्यतिथी साई संस्थानच्या वतीनं साजरी करण्यात आली. त्यानंतर आजतागायत हा पुण्यतिथी उत्सव नव्या उत्साहात साई संस्थानच्या वतीनं साजरा केला जात आहे. त्यामुळं विजयादशमी म्हणजेच साईबाबांची पुण्यतिथी, अशी एक नवी ओळख या सणाची निर्माण झाली आहे. देशभरातील आणि जगभरातील साईभक्त हा उत्सव साजरा करतात. शिर्डीत या पुण्यतिथी उत्सवानिमित्त चार दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

७ ऑक्टोबर रोजी होणार कॅशची काउंटिंग : साईबाबा संस्थानच्या वतीनं साजरा करण्यात आलेल्या चार दिवसीय साईबाबा पुण्यतिथी उत्सवादरम्यान लाखो भाविकांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं.

# वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या फेरीला अल्प प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**नाशिक :** वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची दुसरी फेरी २ ऑक्टोबर रोजी संपुष्टात आली. मात्र पहिल्या फेरीच्या तुलनेत दुसऱ्या फेरीला अल्प प्रतिसाद मिळाल्याचे निदर्शनास आले. पहिल्या फेरीत वैद्यकीय अभ्यासक्रमाला ६ हजार ८४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते. तर दुसऱ्या फेरीमध्ये अवघे ८५१ विद्यार्थांनी प्रवेश घेतले असून, तिसऱ्या फेरीसाठी ६३६ जागा रिक्त राहिल्या आहेत.

राज्यामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पहिल्या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या ८ हजार १३८ जागांवर ६ हजार ८४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते. त्यामुळे दुसऱ्या फेरीसाठी १ हजार २९० जागा रिक्त राहिल्या होत्या. मात्र दुसऱ्या फेरीपूर्वी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाअंतर्गत असलेल्या वैद्यकीय समुपदेशन समितीने राज्यामध्ये खासगी व



सरकारी महाविद्यालयांतर्गत २०० जागांना मान्यता दिली. त्यामुळे दुसऱ्या फेरीमध्ये प्रवेशासाठी १ हजार ४९० जागा उपलब्ध झाल्या होत्या. वैद्यकीय अभ्यासक्रमाची दुसरी फेरी २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात आली. या फेरीअंतर्गत राज्यामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमाला फक्त ८५१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. यामध्ये सरकारी रुग्णालयामध्ये ३८१, तर खासगी महाविद्यालयांमध्ये ४७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले.

# आंबा घाटातील साडेतीन किलोमीटर बोगद्याला मंजुरी; कोकण-प. महाराष्ट्र प्रवास होणार जलद



**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी :** कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या आंबा घाटातील प्रवास आता अधिक सोयीस्कर आणि जलद होणार आहे. या घाटातील डोंगरातून साडेतीन किलोमीटरचा बोगदा काढण्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे.रत्नागिरी-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक वळणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रवास अत्यंत सुरक्षित आणि जलद होईल. सध्या एका खासगी एजन्सीकडून या प्रकल्पाचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण युद्धपातळीवर सुरू असतानाच, साधारण सात किलोमीटर लांबीच्या आंबा घाटाच्या सुधारणा आणि रुंदीकरणाच्या दृष्टीने हे सर्वेक्षण महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः पावसाळ्यात अनेक वेळा दरड कोसळण्याच्या प्रकारांमुळे हा घाट धोकादायक ठरतो.

या पार्श्वभूमीवर, घाटातील धोकादायक भाग कायमस्वरूपी वगळण्यासाठी हा मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. या प्रकल्पाचा अहवाल तयार करताना पर्यावरणाचा समतोल, घाटातील वन्य प्राणी, राष्ट्रीय उद्यान आणि जंगल परिसराचा विचार केला जाणार असून, त्यानुसारच याला अंतिम स्वरूप देण्यात येणार आहे.

# ईशान्य अरबी समुद्रातील ‘शक्ती’ चक्रीवादळाचा धोका वाढला; मच्छीमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** ईशान्य अरबी समुद्रात निर्माण झालेल्या ‘शक्ती’ (Shakti) या चक्रीवादळाची तीव्रता वाढत असून, पुढील काही दिवसांत ते, तीव्र चक्रीवादळात (Severe Cyclonic Storm) रूपांतरित होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. या चक्रीवादळाचा संभाव्य परिणाम दक्षिण महाराष्ट्र किनारपट्टीवर होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

भारतीय हवामान शास्त्र विभागाच्या प्रादेशिक केंद्र, कुलाबा (मुंबई) येथून प्राप्त माहितीनुसार, ‘शक्ती’ चक्रीवादळाने मागील सहा तासांत सुमारे आठ किलोमीटर प्रतितास वेगाने वायव्य दिशेने हालचाल केली आहे. ३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५.३० वाजता हे चक्रीवादळ २२.० अंश उत्तर अक्षांश आणि ६६.४ अंश पूर्व रेखांशाजवळ केंद्रित होते.

त्या वेळी हे केंद्र —

द्वारका (गुजरात) पासून सुमारे २८० किमी पश्चिमेला,नालिया पासून २९० किमी पश्चिम-नैऋत्येला,कराची (पाकिस्तान) पासून ३३० किमी दक्षिण-नैऋत्येला आणि पोरबंदरपासून ३२० किमी पश्चिमेला होते.

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, हे चक्रीवादळ ४ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत तीव्र चक्रीवादळात रूपांतरित होण्याची



शक्यता आहे.

sत्यानंतर ते ५ ऑक्टोबरपर्यंत पश्चिम-नैऋत्येकडे सरकून उत्तर आणि मध्य अरबी समुद्राच्या मध्य भागात पोहोचेल.

मच्छीमारांना सूचना : समुद्रात जाणे टाळा

भारतीय हवामान विभागाने सर्व मच्छीमार, मच्छीमार सहकारी संस्था आणि नौका मालकांना कडक सूचना दिल्या आहेत की, पुढील काही दिवस समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये. वादळी वारे आणि उंच लाटा येण्याची शक्यता असल्याने समुद्र अत्यंत खवळलेला राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने सर्व किनारी जिल्हा प्रशासनांना निर्देश दिले आहेत की, या सूचनेची माहिती सर्व मच्छीमार आणि किनारी गावांतील नागरिकांपर्यंत त्वरीत पोहोचवावी. सागरी सुरक्षितता आणि जीवितहानी टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

# पी ए फाउंडेशन आणि अस्क इंटरनॅशनल ग्रुप ऑफ कंपनी यांच्यातर्फे उद्योजक महिला महामेळावा तथा सत्कार समारोह संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**




**नागपूर :** पी.ए. फाउंडेशन आणि अस्क इंटरनेशनल ग्रुप ऑफ कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक महिला महामेळावा तथा सत्कार समारोह चे आयोजन केले होते. समाजात विविध क्षेत्रात निस्वार्थ कार्य करणाऱ्या महिलांचा / मुलींचा सत्कार करून समाजात वेगळी ओळख तयार करुन त्यांना न्याय व प्रोत्साहन देण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत आहे. 18 लोकांच्या मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्धाटक खासदार श्यामकुमार बर्वे, रश्मि बर्वे, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद् नागपुर, कार्यक्रमाचे अध्यक्ष नितिन राऊत, माजी मंत्री तथा आमदार, सुमेधा राऊत, प्रमुख अतिथि धनंजय वंजारी, आय आर एस, इंकम टॅक्स डिपार्टमेंट, नागपुर, सखाराम मंडपे, माजी मुख्याध्यापक, सुकेसिनी लोखंडे, पोलिस निरीक्षक, सी.बी.आय. नागपुर, सिद्धार्थ गायकवाड़, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण आणि सामाजिक कार्यकर्ता प्रिती प्रधाने प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी खासदार श्यामकुमार बर्वे म्हणाले, पी.ए फाउंडेशन हे महिलांना / मुलींना प्रोत्साहन देऊन त्याना उद्योजिका बनविण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत आहे. महिला ही चूल आणि मूल एवढ्यापर्यंतच मर्यादित राहली नसून आज अश्या सामाजिक संघटनांच्या प्रोत्साहनमुळे राजकीय तसेच इतर सर्वच क्षेत्रात पुढाकार घेत आहे. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे माझी पत्नी रश्मि बर्वे ज़िल्हा परिषद च्या अध्यक्ष राहिल्या आहेत. तसेच देश्याची राष्ट्रपति आज महिला आहे. मला अत्यंत आनंद होत आहे की पी.ए फाउंडेशन महिलांना पुढे आणण्याचे महत्वाचे कार्य करीत आहे. आमदार नितिन राऊत यांनी 1942 ला नागपुर येथे भरलेल्या महिला अधिवेशनाचा उल्लेख करून प्रत्येकाला समाजाचे देणे लागते या भावनेतुन महिला विविध क्षेत्रात आपले नावलौकिक करीत आहेत. व त्यांना पुढे आणण्यासाठी पी.ए फाउंडेशन मोलाचे कार्य करीत असल्याबदल पी.ए फाउंडेशन चे फाउंडर अजय कुमार व सचिना खोब्रागडे यांचे कौतुक केले. धनंजय वंजारी यांनी महिलामध्ये जागृति निर्माण करुन व त्यांना प्रोत्साहन देऊन समाजात त्यांची वेगळी ओळख करून देण्याचे सराहनीय काम करीत असल्याबदल पी. ए फाउंडेशन चे फाउंडर अजय कुमार व सचिना खोब्रागडे यांच अभिनंदन केले. अजय कुमार च्या मागे कुठल्याही मोठ्या व्यक्तीचे पाठबळ नसताना त्यांनी शून्यातून हे विश्व निर्माण केले, विश्वासानी पहिली पायरी चढायची पुढचा प्रवास आपोआप सुखकर होतो याच विश्वासानी त्यांनी आज हजारो महिलाना उद्योजक क्षेत्रात त्यांच्या कठिण परिश्रम, चिकाटी, धैर्य, आत्मविश्वास आणि साहस यामुळेच हे ध्येय गाठले असे मत सखाराम मंडपे यांनी व्यक्त केले आणि पुढच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सिद्धार्थ गायकवाड़, सुकेसिनी लोखंडे, प्रीति प्रधाने यांनी आपले विचार व्यक्त केले. अजय कुमार यांनी पी.ए फाउंडेशनच्या माध्यमातून जवळपास 5 ते 6 हजार महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे आपले मत व्यक्त केले कार्यक्रमाला खेड्या पाड्यातील मोठ्या संख्येनी महिला उपस्थित होत्या. प्रस्ताविक सचिना खोब्रागडे, संचालन मनीषा फुलझेले तर आभार स्पृहा खोब्रागडे हिने मानले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी अजय कुमार, सचिना खोब्रागडे, राज टेम्भुर्णीकर, सुधीर सोमकुंवर, प्रणय ढोके, अनीता गजभिये, संगीता शेंडे, अमोल शेंडे, शालू सुखदेवे, ज्योती यादव, अपेक्षा तांदळे, प्रेरणा चिवंडे, माला मंडपे, अश्विनी मंडपे, ममता मड़के, शेजल गुडधे, मीना गुडधे, शेजल गौरकर, छाया मेश्राम, मंजूषा टेम्भुर्णीकर, छकुली, आरजू, यांनी अथक परिश्रम घेतले.

# कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिरात पालक मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक. युवक आधार**
**जनार्दन चव्हाण प्रतिनिधी**



विंचूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर या विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला अध्यक्ष स्थान ग्रामपंचायत सदस्य सन्माननीय सुमनताई दरेकर यांनी भूषविले.

याप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ नीलिमा शिरसाठ यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा सर्वंकष आढावा घेतला व विद्यार्थी व पालक यांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींची पालकांशी चर्चा केली. सुजान पालकत्व याविषयी पालकांना प्रबोधन करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणखी काय करता येईल या दृष्टीने त्यांनी पालकांना मार्गदर्शन केले

याप्रसंगी विद्यालयाच्या इमारतीच्या दुरुस्ती कामी बहुमोल असे सहकार्य करणारे पालक श्री सुरेश गुंजाळ ,श्री रामदास होन व श्री राहुल ठुबे यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या दुरुस्ती कामासाठी खारीचा वाटा उचलणारे विद्यार्थी अक्षता चव्हाण, आरोही मानकर, यश विंचुरकर व यश जेऊघाले या विद्यार्थ्यांच्या पालकांचाही सन्मान करण्यात आला तसेच शालेय प्रसिद्धी कामी मोलाचे सहकार्य करणारे पालक व पत्रकार बंधू श्री जनार्दन चव्हाण यांचाही विद्यालयाचे वतीने सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ नीलिमा शिरसाठ यांच्या वाढदिवसा निमित्त पालक सभेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अर्थ साक्षरता व मुलांसाठी भविष्यकालीन योग्य त्या आर्थिक गुंतवणुकी संदर्भात स्टेट बँक ऑफ इंडिया चे प्रतिनिधी श्री जाधव व सौ आहेर यांनी पालक सभेला संबोधित केले. तसेच विद्यालयाचे सहशिक्षक श्री लक्ष्मण गायकर यांनी मोबाईलचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी कशा रीतीने सकारात्मक उपयोग करून घेता येईल यासाठी पालकांना मार्गदर्शन केले याप्रसंगी पालकांनी चर्चेत सहभागी घेऊन विद्यालयाच्या सर्वंकष प्रगतीच्या दृष्टीने मोलाचे सहकार्य करण्याचे सुचित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सहशिक्षक श्री संजय त्रिभुवन तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती वर्षा पवार यांनी केले . कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या शिक्षिका सौ वैशाली दरेकर तसेच सौ . उर्मिला जगताप यांनी मोलाचे सहकार्य केले

# जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केली खडकूत येथे पीक कापणी प्रयोगाची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड :** यावर्षापासून पीक विमा योजनेत नुकसान भरपाई निश्चित करताना पीक कापणी प्रयोगाला आधारभूत मानले जाणार आहे. त्यामुळे या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची तांत्रिक चूक होऊ नये, शेतकऱ्यांना योग्य लाभ मिळावा यासाठी जिल्हास्तरावर प्रात्यक्षिक स्वरूपात पीक कापणी प्रयोग राबविण्यात येत आहेत.

आज जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी नांदेड तालुक्यातील मौजे खडकूत येथे शेतकरी बालाजी नागुराव कंकाळ यांच्या शेतावर सोयाबीन पिकाची कापणी करून उत्पन्नाचा अंदाज काढण्यासाठी आयोजित प्रात्यक्षिकाची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. कर्डीले यांनी शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगाचे महत्त्व, पद्धती आणि त्यातून मिळणाऱ्या निष्कर्षांबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांच्या हितासाठी नुकसान भरपाईची रक्कम योग्य प्रकारे ठरविण्यासाठी पीक कापणी प्रयोग अत्यंत महत्त्वाचे असून त्यात पारदर्शकता व काटेकोरपणा आवश्यक आहे.

या प्रात्यक्षिकावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, मंडळ कृषी अधिकारी श्री. सानप, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. कासटेवाड, श्री. येवते, ग्राम महसूल अधिकारी, भारतीय कृषी विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी, ग्रामस्तरीय पीक कापणी समितीचे सदस्य, पोलीस पाटील, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# रिसोड नगर परिषद नागराध्यक्ष पद अ.जा राखीव निघाल्यास रवि अंभोरे निवडणूक लढविणार!

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजितसिह ठाकूर**



सध्या रिसोड शहरासह तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. जिल्हा परिषद वाशिम करता आरक्षणाची सोडत 13 ऑक्टोबरला तर महाराष्ट्र राज्यातील नगर परिषदेची आरक्षण सोडत 6 ऑक्टोबरला मुंबई येथे होणार आहे.त्यामुळे रिसोड नगरपरिषदेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. रिसोड नगरपरिषद निवडणूक लढविण्यासाठी प्रभाग निहाय रचनेनुसार निवडणूक लढविण्याचा मानस ठेवणाऱ्या इच्छुकांची यादी यावर्षी फार मोठी होणार आहे.आपापल्या प्रभागातून प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळावी यासाठी इच्छुकांची फील्डिंग सुरू झाली आहे तर नगराध्यक्ष पदाची निवडणूक थेट जनतेतून होत असल्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढविणारे सर्व शहराच्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास करीत आहेत.खुल्या प्रवर्गातून निवडणूक लढविणाऱ्या मध्ये अनेक दिग्गज उत्सुक असल्याचे नागरिकांच्या चर्चेतून ऐकविण्यात येत आहे परंतु यावेळेस रिसोड नगरपरिषदेचे आरक्षण अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी निघेल असा अंदाज काही राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केला जात आहे. तर अनुसूचित जाती या प्रवर्गामधून सुद्धा नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक असणाऱ्यांची संख्या मोठी आहे सर्वजण आपापल्या पद्धतीने निवडणूक लढविण्याची तयारी करीत आहेत जर अनुसूचित जाती प्रवर्गातून नगराध्यक्ष पद आरक्षित झाले तर रिसोड शहरातील सर्व समाज घटकांशी सलोख्याचे संबंध जोपासणारे आध्यत्मिक, राजकीय, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात अग्रेसर असणारे सर्व परिचित रवि अंभोरे यांनी निवडणूक लढविण्याचा मानस प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला आहे. रिसोड शहराच्या विकासासाठी चांगल्या प्रकारचे काम करण्याची संधी जनतेने दिली तर संधीचे सोने करण्यास कोणतेही कसर सोडणार नाही अशी ग्वाही त्यांच्याकडून व्यक्त केल्या जात आहे.रवि अंभोरे हे राजकारण, समाजकारण व आध्यात्मिक क्षेत्राच्या माध्यमातून त्यांचा सर्व शहरातील मतदारांशी संबंध संपर्क आहे. रवि अंभोरे यांनी नगरपरिषद अध्यक्ष पदाची निवडणूक लढवावी अशी अपेक्षा शहरातील सामाजिक, राजकीय व व्यापारी क्षेत्रात काम करणाऱ्या बुद्धिजीवी वर्गाची आहे. त्यांच्याकडे शहराचा विकास करण्यासाठी आवश्यक असणारा दृष्टिकोन आणि इच्छाशक्ती आहे त्यांच्यासारखा सुशिक्षित सुसंस्कृत सामाजिक प्रश्नांची जाण असणारा आणि शहराच्या विकासासाठी भरीव योगदान देणारा प्रतिनिधी असावा असा मानणारा फार मोठा समूह शहरामध्ये त्यांच्या पाठीशी उभा आहे येत्या 6 ऑक्टोबरला रिसोड नगरपरिषदचे आरक्षण काय सुटते यावर नगरपरिषदेच्या निवडणुकीचे बरेच राजकीय डावपेच अवलंब असणार आहे तूर्तास आरक्षणाची निश्चितता नसल्यामुळे सर्व इच्छुकांचा इच्छुकांना रस्ता मोकळा आहे.

# 69 वा धम्मदिक्षा दिन – विशेष लेख

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बुद्धधम्मावरील विचार : समतेची क्रांती


लेखक - प्रकाश गवारे

१४ ऑक्टोबर १९५६ : इतिहासातील युगांतकारी दिवस

भारतीय समाजरचनेतील सर्वात मोठा सामाजिक-सांस्कृतिक बदल घडवून आणणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर बाबासाहेबांनी स्वतः बौद्धधम्माची दीक्षा घेतली आणि लाखो अनुयायांना नवजीवनाचा, नवधम्माचा मार्ग दाखविला.या घटनेने भारतीय इतिहासाला एक नवे पर्व प्राप्त झाले.

धम्मस्वीकाराचा प्रवास : चिंतन आणि अभ्यास धम्मांतराचा निर्णय बाबासाहेबांनी अचानक घेतलेला नव्हता.

ख्रिस्ती, इस्लाम, शीख, पारशी, हिंदू धर्मातील विविध पंथ आणि बौद्धधम्म – या सर्वांचा त्यांनी सखोल अभ्यास केला.

त्यांना जाणवले की –इतर धर्मांमध्ये आंधळ्या श्रद्धेला, परलोकवादाला अधिक महत्त्व आहे.माणसाचे दुःख कमी करण्याची, समानतेची तत्त्वे मात्र फक्त बौद्धधर्मात आहेत.

**ते स्पष्ट म्हणतात** –

“सर्व धर्मात श्रेष्ठ धर्म जर कोणता असेल तर तो भगवान बुद्धाचा बौद्ध धर्म होय.”

(लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, पान ४६०)

बुद्धधम्म : विवेक आणि चिकित्सेचा धर्म

बुद्धांनी धर्म सांगताना कधीही “मी सांगतो म्हणून स्वीकारा” असे म्हटले नाही.

त्यांनी नेहमीच सांगितले – “विचार करा, विवेक पटला तरच स्वीकारा.”

ही विचारसरणीच बाबासाहेबांना पटली.

**ते म्हणतात** –

“बौद्धधर्म हा रोग निदानानंतर दिलेले औषध आहे.”

(खंड १८, भाग ३, पान ४४१-४४२)

दुःखनिरोध : बौद्धधर्माचे खरे सार बुद्धांचे पहिले सत्य होते – दुःख आहे आणि त्यातून मुक्त होण्याचा मार्ग आहे.

**बाबासाहेबांचे मत** –

“पंचशील, आर्य अष्टांगिक मार्ग आणि दहा पारमिता हे दुःखनिरोधासाठी समर्थ साधन आहेत.”

(खंड १८, भाग ३, पान ४४४)

**जातिभेदाविरुद्ध धम्म:**

भारतीय समाजातील सर्वात मोठा दोष म्हणजे जातिव्यवस्था.हिंदू धर्मात अस्पृश्यांना माणूसपण नाकारले गेले.

परंतु बौद्धधर्मात जातिभेदाला स्थान नाही.

**बाबासाहेबांचे ठाम विधान** –

“बौद्ध धर्म हाच खरा समतेचा धर्म आहे.”

(खंड १८, भाग ३, पान ४३९)

बौद्धधर्म : सर्वांसाठी कल्याणकारी

**बाबासाहेब म्हणतात** –

“बुद्धधर्म हा बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, प्रेमासाठी आहे. … जसा ऊस सुरुवातीपासून शेवटपर्यंत गोड असतो, तसाच बौद्धधर्म सुरुवातीलाही, मध्यातही व शेवटीही कल्याणकारी आहे.”

(खंड १८, भाग ३, पान ४३०)

धम्मांतर : एक ऐतिहासिक क्रांती

बाबासाहेबांनी १९३५ मध्येच जाहीर केले होते –

“मी हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.”

आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी ही प्रतिज्ञा पूर्ण केली.

**दीक्षाभूमीवर ते म्हणाले** –

“आज माझी नरकातून सुटका झाली आहे.”

२२ प्रतिज्ञा – नवा जीवनमार्ग

धम्मदिक्षेच्या वेळी बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा दिल्या.

त्यात :

अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता पाळण्याचे वचन

सर्व प्राणिमात्रावर दया करण्याची प्रतिज्ञा

समता, बंधुता, स्वातंत्र्य यांची बांधिलकी

यातून बुद्धधम्माचे खरे तत्त्वज्ञान स्पष्ट होते.

बौद्धधर्म : भारताचे खरे वैभव

बाबासाहेबांनी “बुद्धधर्माचा भारतातील प्रादुर्भाव आणि फ्रेंच राज्यक्रांती” या दोन्हींची तुलना युगांतकारी घटना म्हणून केली.

त्यांच्या मते –

बुद्धधम्मामुळे गणतंत्राचा विकास झाला,अशोकासारख्या सम्राटांनी भारताला आंतरराष्ट्रीय कीर्ती दिली,

कला, साहित्य, विद्याशाखा समृद्ध झाल्या.

**त्यामुळे ते म्हणाले** –

“बौद्धधर्म हा भारताचा खरा वैभव आहे.”

बाबासाहेबांचे अंतिम आवाहन

**डॉ. आंबेडकरांचे शब्द** –

“माझ्या सर्व बांधवांना शेवटची हाक देतो – मुक्ती साधायची असेल तर बौद्धधर्म स्वीकारा.”

(खंड १८, भाग ३, पान ४३८)

निष्कर्ष : समतेच्या नवभारताची क्रांती

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बुद्धधम्माबाबतचे विचार हे केवळ धार्मिक चिंतन नव्हते, तर ते समाजक्रांतीचे घोषवाक्य होते.

त्यांच्या दृष्टीने बौद्धधर्म हा :

समतेचा धर्म

विवेकाधारित धर्म

दुःखनिरोधाचा धर्म

**मानवतेच्या कल्याणाचा धर्म:**

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी दाखविलेल्या या मार्गाने लाखो लोकांना नवजीवन, नवा आत्मसन्मान आणि नवभारताचे दर्शन दिले.

# श्री क्षेत्र टेरव येथे नवरात्रौत्सव उत्साहात झाला संपन्न

**दैनिक युवक आधार**



**(प्रमोद तरळ) चिपळूण :** दसपटी विभागातील श्री क्षेत्र टेरव येथे भाविक व पर्यटकांचे आकर्षण ठरलेल्या तसेच महाराष्ट्र शासनाने यात्रास्थळ व पर्यटनाचा क दर्जा व तीर्थक्षेत्राचा ब दर्जा बहाल केलेल्या व नवसाला पावणारी देवी म्हणून ख्याती असलेल्या कुलस्वामिनी श्री भवानी वाघजाई देवस्थानात सालाबादप्रमाणे या वर्षीही आदिशक्ती जगद्जननी श्री भवानी वाघजाई मातेचा नवरात्रौत्सव पारंपारिक रूढी परंपरेप्रमाणे धार्मिक विधी व पूजन करून उत्साहात साजरा करण्यात आला. ब्राह्मणाने विधीवत पूजन व मंत्र म्हणून घटस्थापना केली. मंत्रोच्चार करून दोन दिप प्रज्वलित केले. देवस्थानच्या पुजाऱ्यांनी मानकऱ्यांच्या हस्ते घटाची विधीवत पूजा करून घेतली. नवरात्रीत दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी लोटली होती. रात्री उशीरापर्यंत असंख्य माता भगिनी भवानी वाघजाई मातेची ओटी भरण्यास येत होत्या. उत्सवादरम्यान अभिषेक, पूजा - अर्चा, चंडीपाट, नवचंडी याग, हरिपाठ, संगीत भजन, इ. धार्मिक कार्यक्रमांचे तसेच रासगरबा, जाखडी नृत्य व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्रीत १० दिवस भाविकांना शिरा, जिलेबी, लाडू, इ. प्रसादाचे वाटप करण्यात आले.

पालखी सजवून रुपी लावण्यात आली होती व अश्विन शु. नवमीला ब्राह्मणाद्वारे विधीवत पूजा करण्यात आली. पुजाऱ्यांनी मानकऱ्यांच्या हस्ते रुढीवत पूजा करून घेतली. मानकऱ्यांच्या हस्ते प्रतिकात्मक बळी देऊन देवीचे घट हलविण्यात आले. रात्री पालखी नाचवत ढोल ताश्याच्या गजरात मंदिरा भोवती प्रदक्षिणा घालून छबिना काढण्यात आला, त्यात समस्त ग्रामस्थ, भाविक सामील झाले होते. एका दानशूर भक्ताने गेल्या अनेक वर्षा प्रमाणे या वर्षीही मंदिरास तसेच उद्यान परिसरात नेत्रदीपक विद्युत रोषणाई करून प्रवेशद्वार तसेच देवींचे गाभारे आकर्षक फुलांनी सजवून आजोळच्या आई भवानी - वाघजाई चरणी आपली सेवा रुजू केली. श्री भवानी, वाघजाई, कालकाई, महालक्ष्मी, कुलस्वामीनी या देवींना नवरंगाच्या साड्या परिधान करून सोन्या-चांदीच्या मौल्यवान अलंकारांनी सालंकृत करण्यात आले होते.

श्री जगतगुरु नरेंद्र महाराज सेवा समिती यांच्या विविध केंद्रांच्या वतीने अनेक महिला भगिनींनी सतत १० दिवस मंदिर आणि मंदिर परिसर स्वच्छ करून आपली सेवा रुजू केली. टेरवचे सुपुत्र श्री चिराग शैलेशराव मोरे यांनी ड्रोन कॅमेऱ्याने विद्युत रोषणाई, फुलांची सजावट, उद्यान, मंदिर, देवदेवतांचे मूर्ती, मंदिर परिसराचे केलेले व्हिडिओ हे खास आकर्षण ठरले होते.

सदर उत्सवादरम्यान लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी वर्ग, विद्यार्थी व महाराष्ट्रातूनच नव्हे तर कर्नाटक, गुजरात व इतर अनेक राज्यातून आलेल्या भाविकांनी व मान्यवरांनी दर्शनाचा लाभ घेतला. अनेक भाविकांनी आपले नवस फेडले.


दसऱ्याला रूढी परंपरेप्रमाणे पूजन करून ग्रामस्थांनी मंदिरात सोने लुटून, परस्परांना वाटून एकमेकांना शुभेछा दिल्या. असंख्य भाविक, पर्यटक, ग्रामस्थ, माहेरवाशिणी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जगदंबेच्या दर्शनाचा लाभ घेतल्याबद्दल तसेच हा नवरात्रौत्सव भव्य दिव्य स्वरुपात व आनंदात साजरा व्हावा म्हणून ज्यांनी ज्यांनी विशेष श्रम घेतले व सहकार्य केले त्या सर्वांचे मंदिर व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले.

# लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी व खा. मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे मांडले आदिवासी समाजाची व्यथा..

## आदिवासी समन्वय समिती, रायगड जिल्हाध्यक्ष गणपत वारगडा यांनी दिल्ली कार्यालयात जाऊन दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी :**

आदिवासी समाजात बंजारा जातीला समाविष्ट करण्यासाठी हैद्राबाद गॅजेट पुढे करून बंजारा समाज सरकारवर दबाव आणून असंविधानिक पद्धतीने मागणी करत आहे. तसेच धनगर समाज सुद्धा आदिवासीमध्ये येण्यासाठी मोर्चे काढत आहेत. या बंजारा, धनगर समाजाला विरोध म्हणून आणि आदिवासी आरक्षणाला धक्का लागू नये याकरिता आदिवासी समाजाने प्रत्येक जिल्हा, तालुक्यात मोर्चे व आंदोलन चालू आहेत, एवढच नाहीतर काही दिवसापूर्वी मंत्रालयावर आदिवासी समाजाचा जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी सरकारच्या वतीने स्पष्ट सांगण्यात आले, कि बंजारा आणि धनगर समाजाला आदिवासी समाजामध्ये घेता येणार नाही. तरी सुद्धा बंजारा व धनगर समाज सरकारवर दबाव




तंत्र टाकण्याचा प्रयत्न करत आहे.

भारत देश संविधानावर चालणारा आहे, गॅंजेटवर नाही. शिवाय अनुसूचित जाती व जमातीचा आरक्षण संविधानीक आहे. त्यामुळे ते बदलण्याचा कोणाचा अधिकार नाही. म्हणून केंद्र सरकारला लक्षात आणून देण्यासाठी आदिवासी समन्वय समिती- रायगड, जिल्हाध्यक्ष गणपत जानू वारगडा यांनी केंद्रातील विरोधी पक्ष नेते, खासदार राहुल गांधी व खासदार, कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना बुधवारी (दि. ०१ ऑक्टोबर) रोजी दिल्ली येथील कार्यलयात जाऊन निवेदन दिले आहे.

**दिलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्या..**

--------------------

१) बंजारा व धनगर जातीला आदिवासी समाजात (अनुसूचित जमाती) मध्ये समाविष्ट करू नये.

२) आदिवासी जमिनींची हंस्तातरण थांबावणे, तसेचबिगर आदिवासीनीं घेतलेल्या जमिनी आदिवासीच्या परत करून मूळ मालकाला परत करा.

३) अनुसूचित जाती, जमाती प्रतिबंधक कायदा १९८९ (अट्रॉसिटी ऍक्ट) मजबूत करणे.

४) वन जमिनी व दळी जमिनी आदिवासीच्या वहीवटी प्रमाणे वैयक्तिक व सामूहिक दावे मंजूर करणे, तसेच त्या जमिनीचा ७/१२ उतारा व नकाशे घडवण्यात यावे.

५) प्रत्येक जिल्हा, तालुका ठिकाणी असणाऱ्या शासकीय कमिटी/ समितीमध्ये स्थानिक आदिवासी कार्यकर्त्यांचा समाविष्ट करण्यात यावे.

६) महाराष्ट्रात आदिवासीची संस्कृती, परंपरा टिकवणे व समाजाला समाजकार्य करण्यासाठी प्रत्येक जिल्हा व तालुक्यात आदिवासी भवन उभारणे तसेच युवक, युवातींकरिता प्रशिक्षण ऑकडमी तयार करणे.

७) रायगड जिल्हात पेसा कायदा लागू करणे.

८) भुदान समिती मा. विनोबा भावे यांनी गोरगरिबांना जमीन मिळावी, म्हणून भुदान व ग्रामदान चळवळ सुरु केली होती. मात्र या जमिनी बांधकाम विकासकांना (बिल्डर्स) देण्यात येत आहेत. सदर रायगड/ पुणे/ ठाणे/ नवी मुंबईमध्ये असणाऱ्या भुदान समिती (महाराष्ट्र ग्रामदान व नवनिर्माण समिती) जमिनी गोरगरीब आदिवासीना वाटप करण्यात यावे.

९) आदिवासीचे गावठाण/प्लॉट बिगर आदिवासीनीं बेकायदेशीर व चुकीच्या प्रकारे हडप केलेले आहेत, ते गवठाण/प्लॉट परत आदिवासीना (अनुसूचित जमाती) देणे व चौकशी करून गुन्हे दाखल करणे.

१०) सरकारी व खाजगी जागेवर पूर्वीपासून राहणाऱ्या आदिवासीचे घरे कायम करणे व ७/१२ उताऱ्यावर नोंदी घेणे.

## निफाडमध्ये गोळीबार — जुन्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला, थोडक्यात बचावला

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधीराहुल कुलकर्णी**

निफाड : जुन्या भांडणाचा राग मनात ठेवून निफाड तालुक्यातील जळगाव फाटा परिसरात एका २७ वर्षीय तरुणावर चार जणांनी हल्ला करून गावठी कट्ट्याने गोळीबार करत त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी (३ ऑक्टोबर) रात्री घडली. सुदैवाने गोळ्या शरीराला चाटून गेल्याने तरुण थोडक्यात बचावला.

पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ मनोहर साळवे (वय २७, रा. सुंदरपूर) हा असिफ किराणा दुकानासमोर उभा असताना दोन महिन्यांपूर्वी झालेल्या वादाची कुरापत मयूर ढगे (रा. बेघर वस्ती, निफाड) याने काढली. त्याच्या सांगण्यावरून विजय शिंदे (रा. मटण मार्केट समोर, निफाड), विशाल केंदळे (रा. स्मशानभूमी शेजारी, निफाड) आणि पृथ्वीराज जाधव (रा. काथरंगाव, ता. निफाड) यांनी साळवे याला "तू माजला आहेस का? थांब, तुझा बेत पाहतो" असे म्हणत दमदाटी केली व शिवीगाळ केली.

या दरम्यान, पृथ्वीराज जाधव याने आपल्या लाल रंगाच्या जॅकेटमधून गावठी पिस्तुल काढून सिद्धार्थ साळवे याच्यावर सलग तीन गोळ्या झाडल्या. त्या गोळ्या उजव्या कंबरेजवळील बरगडी व खांद्याला चाटून गेल्याने साळवे जखमी झाला, मात्र जीव वाचला.

या प्रकरणी साळवे याच्या फिर्यादीवरून निफाड पोलिसांनी मयूर ढगे, विजय शिंदे, विशाल केंदळे आणि पृथ्वीराज जाधव या चौघांविरोधात भारतीय दंड संहिता कलम १०९, ३५२, ३५१(२), ३(५) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

शनिवारी सकाळी नाशिक येथून आलेल्या फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी झाडलेल्या गोळ्या जमा करून पंचनामा केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून संशयितांच्या शोधासाठी पोलीस पथक रवाना करण्यात आले आहे.

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न – पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

**नंदुरबार :** राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी आज अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नंदुरबार तालुक्यातील चौपाळे पंचक्रोशीतील भागांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि शासनाकडून तातडीने दिवाळीपूर्वी मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

पालकमंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, नंदुरबार जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्याने जिल्हा अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करण्यात आला आहे. या अतिवृष्टीत पपई, केळी, कापूस तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सुमारे दोन हजार हेक्टर



क्षेत्र बाधित झाले आहे. पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे पाठविण्याची प्रक्रिया सुरू असून, शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मदत मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

ॲड. कोकाटे यांनी स्पष्ट केले की, "कुठल्याही विमा कंपनीचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. ज्या शेतकऱ्यांनी पिकविमा उतरवला आहे, त्या सर्वांना शासनाकडून मदत मिळणार आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, नंदुरबार तालुक्यात सुमारे २० किलोमीटर परिसरात मोठे नुकसान झाले असून प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत आहे.

कृषी धोरणावर भाष्य करताना त्यांनी म्हटले की, "निसर्गासमोर टिकाव धरणारे कृषी धोरण राबवले पाहिजे. केळी आणि पपई सारख्या पिकांवर अतिवृष्टीचा मोठा परिणाम होतो. त्यामुळे अशा परिस्थितीत नवीन दृष्टिकोनातून कृषी धोरणाचा विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी आपण शासन पातळीवर पाठपुरावा करणार आहोत."

या पाहणी दौऱ्यात आमदार राजेश पाडवी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सी. के. ठाकरे महसूल, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.


# स्वैच्छिक रक्तदान... सर्वश्रेष्ठ दान

समाजामध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजविणे व तरुण पिढीला रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे तसेच त्यांच्यामध्ये रक्तदानाबद्दल जागृती निर्माण करणे, स्वैच्छिक रक्तदानाची संकल्पना रूढ करणे यासारख्या समाजोपयोगी उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी 'राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस' दरवर्षी १ ऑक्टोबरला साजरा केला जातो. त्यानिमित्ताने स्वैच्छिक रक्तदानाबद्दल ही माहिती.

एकविसाव्या शतकात मानवाने आजपर्यंत विज्ञान, आरोग्य, शेती तंत्रज्ञान, औद्योगिक, आधुनिक तंत्रज्ञान, इ.आदी क्षेत्रात भरपूर प्रगती केली आहे. मात्र मानवी रक्ताला दुसरा पर्याय शोधण्यात आजपर्यंत मानवाला अथवा विज्ञानाला यश मिळाले नाही. यासाठी माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त लागते. यासाठी रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदान जनजागृतीपर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन, राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था तसेच वेगवेगळ्या सामाजिक संस्था, औद्योगिक क्षेत्र, महाविद्यालय (एन.एस.एस.आणि एन.सी.सी) आदिंच्या माध्यमातून स्वैच्छिक रक्तदान मोहीम जनजागृतीपर यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस सर्वप्रथम १ ऑक्टोबर १९७५ या दिवशी इंडियन सोसायटी आँफ ब्लड ट्रान्सफ्यूजन अँण्ड इम्यूनो हिमँटोलाँजी या संस्थेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. इंडियन सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन अँण्ड इम्यूनो हिमॅटोलॉजी या संस्थेची स्थापना २२ ऑक्टोबर १९७१ या दिवशी के.स्वरुप क्रिशेन आणि डॉ. जे.जी. ज्वाली यांनी केली. जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि रेड क्रेसेंट सोसायटी, इंटरनॅशनल फेडरेशन आँफ ब्लड डोनर ऑर्गनायझेशन आणि इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन यांनी सुरक्षित रक्त आणि रक्त उत्पादकांच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि स्वैच्छिक रक्तदान करून रक्तदान महायज्ञात रुग्णांचे प्राण वाचविणाऱ्या 'स्वैच्छिक रक्तदाता' म्हणून या मोहिमेत सामील झालेल्या रक्तदात्यांचे आभार मानले पाहिजे. हा कार्यक्रम प्रथमच २००४ मध्ये चार प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थाद्वारे आयोजित करण्यात आला होता. याला यावर्षी २१ वर्षे पूर्ण होत आहेत.

दरवर्षी आपण राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस साजरा करीत असतो. समाजामध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजवणे तरुणपिढीमध्ये रक्तदानाबद्दल जागृती निर्माण करणे. प्रोफेशनल डोनर व बदली रक्तदाता ही संकल्पना कालबाह्य करून स्वैच्छिक रक्तदानाची मुहूर्तमेढ रुजवणे निरोगी व तंदुरुस्त असताना देखील जे लोक रक्तदान करीत नाहीत त्यांना रक्तदानासाठी प्रेरणा देणे हा यामागचा हेतू आहे. राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस हा दरवर्षी १ ऑक्टोबरला साजरा करण्यात येतो. याशिवाय संपूर्ण ऑक्टोबर महिन्यामध्ये रक्तदानासंबंधीच्या विविध उपक्रमाचे आयोजन रक्तपेढ्यामार्फत व शासनामार्फत करण्यात येते.



चालू वर्षी २०२५ चे घोषवाक्य 'रक्तदान करूया, आशा जागवूया, एकत्रित येऊन जीवन वाचवूया' असे आहे.

**दानाचे महत्त्व**

दानाचे महत्त्व आपणा सर्वांनाच ठाऊक आहे यामध्ये अन्नदान, कन्यादान या परंपरागत दानांबरोबरच शास्त्रीय पद्धतीची दाने. उदा. देहदान, अवयदान, नेत्रदान व रक्तदान ही देखील आपण समजून घेतले पाहिजेत. कारण रक्तदान ही काळाची गरज बनली असून रक्ताच्या निर्मितीला अद्यापही मानवाला पर्याय निर्माण करता आलेला नाही.

मानवी शरीरात अंदाजे ५.५ रक्त असते. रक्तामध्ये काही घटक असतात. उदा. तांबड्या पेशी, पांढऱ्या पेशी, रक्तबिंबिका, प्लाजमा इत्यादी. संपूर्ण शरीरभर ऑक्सिजन वाहून नेण्याचे काम रक्त करते. रक्तामधील महत्त्वाचा घटक हिमोग्लोबिन असतो. हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाल्यास एनिमिया (पंडू रोग) होतो. रक्ताचे विविध आजार मानवांत पाहायवास मिळतात. उदा. ॲनिमिया, थॅलिसिमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, ल्युकेमिया, प्लेटलेटचे आजार, कॅन्सर इत्यादी रक्ताशी निगडित काही आजारामध्ये वारंवार रक्त संक्रमण करावे लागते आणि इथेच रक्तदानाचे महत्त्व लक्षात येते. या रक्तदानासंबंधी अमरावतीच्या जिल्हा रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. संदेश यमलवाड यांनी विस्तृत माहिती दिली.

**रक्तदान म्हणजे काय?**

एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या संमतीने एखाद्या रक्तपेढीत किंवा रक्तदान शिबिरात रक्त देणे म्हणजेच रक्तदान रक्तदान हे स्वैच्छिक असले पाहिजे व कोणत्याही मोबदल्यात रक्तदान करणे, बदली रक्तदाता होणे या रक्त दात्याच्या संकल्पना कालांतराने पुसट करून स्वैच्छिक रक्तदानाची मोहीम जनमानसात रुजवणे हेच या रक्तदान दिवसाचे महत्त्व असते. ज्या माणसाचे वय १८ ते ६० वर्ष, हिमोग्लोबिन १२.५ पेक्षा जास्त, वजन ४५ किलो पेक्षा जास्त नाडीचे ठोके ८० ते १०० प्रतिमिनिट, तापमान ३७.५ रक्तदाब नियमित व जर आधी रक्तदान केले असेल तर ३ महिने पूर्ण झालेल्या कालावधी इत्यादी घटक जो रक्तदाता पूर्ण करतो तोच रक्तदान करू शकतो.

**रक्तदान का करावे**

दान केल्याचे समाधान मिळते. शरीरात रक्त निर्मितीस चालना मिळते. रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. कर्करोग किंवा हृदयरोगासारख्या आजारांच्या धोक्याचे प्रमाण कमी होते. शरीरातील ५.५ रक्तामधून ३५० ते ४५० मिली रक्त एका रक्तदानात दान करता येते. हे रक्त २४ तासात भरून निघते तसेच हिमोग्लोबिन व रक्त घटक दोन महिन्यात पूर्वपदावर येतात. रक्तदान केल्याने काही अपाय होईल का अशी अनामिक भीती काहीच्या मनात असते. परंतु रक्तदानाने तोटा काहीच नसून रक्तदानाचे फायदेच अधिक आहेत. कोणत्याही शासनमान्य रक्तपेढीत व रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते असेही डॉ. संदेश यमलवाड यांनी सांगितले.

नवजात लहान बालके, प्रसुतीपूर्व प्रसवणाऱ्या व प्रसुतीपश्चात माता. अपघात किंवा युद्धात झालेल्या अतिरक्तस्त्रावानंतर रक्ताशी निगडित अनुवंशिक आजारामध्ये (उदा. थॅलीसिमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, ॲनिमिया) साथीच्या रोगाचे रुग्ण (उदा. मलेरिया, डेंग्यू), रक्तघटकांशी निगडित आजारीत रुग्ण, जडीत रुग्ण प्रथिनांची कमतरता असणारे रुग्ण, डायलिसिस चे रुग्ण, कॅन्सरचे रुग्ण यांच्यासाठी रक्तदान करता येते. रक्तदान ही एक सामाजिक संकल्पना म्हणून रुजवली गेली पाहिजे युवक युवतींनी रक्तदानाचे महत्त्व समजून घेऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान केले पाहिजे. आपण वर्षातून चार वेळेस दर तीन महिन्याच्या अंतराने रक्तदान करू शकतो. रक्तदानानंतर प्रत्येक शासकीय रक्तपेढी तर्फे एक रक्तदाता कार्ड देण्यात येते. ज्यावर अडचणीच्या प्रसंगी कोणत्याही शासकीय रक्तपेढीतून रक्त साठ्याच्या उपलब्धतेनुसार एक रक्तपिशवी मोफत देण्यात येते. या कार्डची वैधता दोन वर्षापर्यंत असते. रक्तदानानंतर प्रत्येक रक्त पिशवीची रक्तपेढीत तपासणी करून (एचआयव्ही, एचबीव्ही, एचसीव्ही, (कावीळ), सिफीलीस व मलेरिया) तपासणीअंती निर्दोष असणारी रक्तपिशवीच रक्तपेढ्यांतर्फे रुग्णांना वितरित केली जाते. आता वैज्ञानिक उत्क्रांतीमुळे रक्तातील घटक देखील वेगळे करून गरजेनुसार रुग्णांना देता येऊ शकते. (उदाहरणादाखल – तांबड्या रक्तपेशी, थैलीसीमिया रुग्ण रक्तबिंबिका-डेंग्यू मलेरियाचे रुग्ण प्लाजमा-जळीत रुग्ण लिव्हरचे आजार, फॅक्टर ८ व ९ हिमोफिलिया रुग्ण.)

रक्तदानाची उपयोगिता

ए, बी, ओ, एबी हे मूलभूत रक्तगट असून प्रत्येकाचे पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असे प्रकार पडतात. त्यापैकी 'ओ' निगेटिव्ह हा युनिवर्सल रक्तदाता असून एबी पॉझिटिव्ह हा युनिव्हर्सल रक्त घेणारा या प्रकारात मोडतो. वैज्ञानिक संशोधनामुळे अजूनही रक्तगटाचा अभ्यास होऊन रक्तगटाचा शोध लागला आहे, लागत आहे. रक्त कधी आणि कोणाला लागेल, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे रक्तदानाबद्दल नियमित जनजागृती करून रक्तदान चळवळीला सर्वांनीच हातभार लावण्याची गरज आहे.

निगेटिव्ह ग्रुपच्या रक्तदात्यांचे रक्त नेहमी राखीव ठेवल जाते. त्यातल्या त्यात एबी निगेटिव्ह हे अत्यंत दुर्मिळ रक्तगट आहे. त्यासाठी गरज पडेल तसे एबी निगेटिव्ह रक्त दात्यांना रक्त केंद्रात बोलावल जाते आणि रक्तदान करण्यास मदत करावयास सांगितले जाते. मानवी शरीरात कमीत कमी पाच लीटर रक्त असते. शरीरातील पाच लिटर रक्तापैकी ४५० किंवा ३५० मिली रक्त घेतले जाते. ते रक्त २१ दिवसात शरीरात पुन्हा तयार होते. त्याच रक्तदात्याकडून पुन्हा रक्तदान करावयाचे असल्यास ९० दिवस अंतर ठेवूनच रक्तदान करावे, असे कायदे आहेत. रक्तदात्याचे किमान वजन ४५ पेक्षा जास्त असावे. १८ ते ६५ वर्ष या वयोगटातील कोणालाही रक्तदाता होता येते. मात्र त्याच्या शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण १२.५ ग्रॅम पर डेसीलिटर पेक्षा जास्त असावे. निरोगी मनुष्य दर तीन महिन्यांनी रक्तदान करू शकतो. जर तो मद्यपी असेल तर मद्यपानानंतर ४८ तासांनी रक्तदान करू शकतो. महिला मासिक पाळीचा काळ वगळता नियमित रक्तदान करू शकतात. मात्र हिमोग्लोबीनचे प्रमाण हे १२.५ ग्रॅम पेक्षा अधिक असावेत. प्रसुतीनंतर एक वर्षभर रक्तदान करता येत नाही. मानवी शरीरात ३५ हून अधिक रक्त समूह प्रणाली आढळली आहे. त्यातील एबीओ आणि आर एच रक्त समूह प्रणाली अत्यंत महत्त्वाची आहे.अनेक प्रकारचे रक्तगट आहेत. ते सर्वत्र उपलब्ध रहाण्याकरता रक्त देवाण-घेवाण अखंडपणे कार्यरत असणे अत्यावश्यक असते. रक्त शिबिरे यांचे समान वाटप जिल्ह्यात करण्यात आले पाहिजे. जेणेकरून रक्त तस्करी म्हणजेच रक्त आणि रक्त घटके वितरण व्यवसाय होणार नाही. राष्ट्रीय रक्त धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले गेले पाहिजे. शासकीय रक्तपेढी ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापित करून ती अधिक सक्षम करण्यात यावी, जेणेकरून निःशुल्क वितरण सर्वांना मिळेल. याचा फायदा सर्वसामान्य गरजू रूग्णांना होईल व अनेकांना जीवदान मिळू शकेल.

**सक्रीय सहभाग महत्त्वाचा**

समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निःस्वार्थीपणे, समाजहितासाठी, राष्ट्रसेवा म्हणून रक्तदान महत्त्वाचे. ऐच्छिक रक्तदाता म्हणून व्हॉट्सअप ग्रुप, सोशल मीडिया, डिजिटल माध्यमातून रक्तदान शिबीर तसेच रक्तदाता नोंदणी संपर्क अभियान राबवून रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मदत होऊ शकते. रक्तदान अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टल https://eraktkosh.mohfw.gov.in/ या वेबसाईटवर रजिस्टर नोंदणी करून ऐच्छिक रक्तदान करुन रक्तदानाबद्दल ऑनलाईन रक्तदान प्रमाणपत्र देता येते. या रक्तदान मोहिमेत आपणही सहभागी होऊन आपण रुग्णांचे प्राण वाचविण्याचे पवित्र काम करु शकता. अनेक सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था आणि सामान्य माणसांनीही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणावर पुढे यायला हवे. त्यामुळेच देशात आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध होईल. रक्तदान हे महान कार्य आहे तसेच मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाविषयी प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज उभी करून रक्तदात्यांमध्ये ऐच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी, या मागचा एवढाच उद्देश.

**- अनिल आलुरकर**

# रिसोड च्या सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद निवडणूक मतदारांनी सिरिअस घ्यावी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड.प्रतिनिधी रणजितसिह ठाकूर**

रिसोड नगरपरिषद निवडणूक येत्या काही दिवसात लागणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने रिसोड शहरात इच्छुकांची भाऊ गर्दी दिसत आहे. काही इच्छुक असूनही मी निवडणुकीच्या कोणत्याही फांद्यात पडत नाही असा दिखावा करणारे सुद्धा भरपूर आहेत. काही जण तर गुडघ्याला बाशिंग बांधून मीच भावी नगरसेवक या अविर्भावात वावरत आहेत. काही इच्छुकांची स्थिती थोडीशी वेगळी आहे इच्छुक असूनही सध्या शहरात सुरू असलेल्या ताई भाऊ,आणि दादा यांच्या राजकारणात कोणाचे पारडे जड याचा शोध घेत त्यांच्या बाजूने उमेदवारी मिळते का?असा प्रयत्न करीत आहेत.

इच्छुक उमेदवार हा कोणत्याही प्रकारात मोडत असला तरी तो या शहराचा नागरिक म्हणून शहराच्या विकासाशी कटिबद्ध असला पाहिजे.केवळ कोणाच्या ताटाखालची मांजर होऊन पाच वर्ष फक्त नगरसेवकाचे पद लावून आणि कोणते पाकीट कुठून मिळते याचा कानोसा घेत बसणारा लाचार नगरसेवक असू नये,अन्यथा या शहराचा विकास जिथेच्या तिथेच राहील आणि मतदारांना पश्चाताप केल्याशिवाय काहीही हाती लागणार नाही. म्हणून येणारी नगरपरिषदेची निवडणूक ही




मतदाराने स्वतःहून सिरीयस घेणे म्हणजेच गांभीर्याने घेणे फार महत्त्वाचे झाले आहे

शहरात राजकारणात येऊ इच्छिणाऱ्या,समाजाची सेवा करू इच्छिणाऱ्या अनेक सुशिक्षित तरुणांची फळी समाजकार्य करू पाहत आहे परंतु अल्पशिक्षित अशिक्षित सामाजिक प्रश्नाचे भान नसलेले, अराजकीय केवळ दादाचा, ताईचा भाऊंचा,काकांचा मागेपुढे फिरणारा कार्यकर्ता म्हणून त्याला नगरसेवक म्हणून पुढे करणे हा जनतेने स्वतःचाच केलेला मोठा आत्मघात ठरेल म्हणून मतदाराने सुशिक्षित आणि ज्यांचे वर्तन सौदार्यपूर्ण आहे सर्वसामाजिक स्तरातील नागरिकांची ज्यांचा सलोखा आहे त्यांनाच प्रतिनिधी म्हणून मतदान करावे. मतदारांनी निवडून दिलेला नगरसेवक त्याला किमान त्याच्या प्रभागातील समस्यांची जाणीव असावी आणि त्या समस्या सोडवण्यासाठी संविधानिक मार्गाने प्रयत्न करण्याचे भान असावे ही किमान अपेक्षा मतदाराने ठेवली पाहिजे. दर पाच वर्षांनी होणाऱ्या रिसोड नगरपरिषद निवडणुकीत सांडपाणी निचरा, शुद्ध पिण्याचे पाणी, कचऱ्याची विल्हेवाट, पक्के अंतर्गत रस्ते याच बाबींवर निवडणूक लढवीन्यात आली आहे. अतिशय सुजाण, सुज्ञ, दिग्गज नेत्यांचे गाव म्हणून रिसोड शहराची ओळख आहे परंतु नगर परिषदेतील कारभार पाहता चुकीच्या पद्धतीने निवडणूक लढविलेले किंवा जनतेने पुढे केलेले नगरसेवक यांच्यामुळे विकास स्वच्छता,सौन्दर्यकरण इत्यादी बाबींचा कोणताही प्रभावी कार्यक्रम राबविल्या जात नाही. विद्यमान नगर परिषद सदस्यांचा कार्यकाळ संपला तेव्हाच्या काळात प्रशासकांची नेमणूक झाल्यापासून प्रशासकाने उत्कृष्ट काम केल्यामुळे जनतेला त्यांचे प्रश्न रेटणारे, मांडणारे, सोडविणारे नगरसेवक न भेटत असल्यामुळे यापुढे निवडणूक होऊ नये असा स्वप्न विलास होत आहे. परंतु यावेळेस मतदारांना सुशिक्षित, सुज्ञ, सामाजिक बांधिलकीचे जाण असणारा आणि रिसोड शहराला विकासाच्या दिशेने नेणारा नगरसेवक निवडून देण्याची संधी मिळणार आहे. मतदार जागृत झाला तर कोणतीही पात्रता नसलेले हौसे-गवसे इच्छुक समोर न येता मागच्या दाराने माघार घेतील आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे मग ते कोणत्याही पक्षाशी संबंधित असो दादाचे,ताईचे,भाऊंचे,काकांचे कोणाचेही कार्यकर्ते असो त्यांना संधी मिळेल आणि त्यांना मिळालेली संधी रिसोड शहराच्या विकासाचे सोनं करेल त्यासाठी मतदार म्हणून सर्वांनी आपले महत्त्व ओळखणे गरजेचे आहे मतदान जागृत राहून करणे अत्यंत आवश्यक आहे..

## अत्तेवार विद्यालयात शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

तुपटाकळी येथील डॉ.अच्युत दुलाप्पा अत्तेवार हायस्कूल येथे शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते .माध्यमिक शिक्षणाधिकारी रवींद्र काटोलकर यांच्या संकल्पनेतून संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात एकाच दिवशी दिनांक 26 सप्टेंबर रोजी शालेय स्तर विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि सृजनशीलता विकसित करणे हा होता. उपक्रमामुळे आत्मविश्वास वाढून भविष्यातील वैज्ञानिक तयार होण्यास मदत होईल असे मत उद्घाटक म्हणून लाभलेले जि प प्राथमीक शाळेचे मुख्याध्यापक श्री नंदकिशोर ढोले यांनी व्यक्त केले याप्रसंगी राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री सुरेश बाहेकर अरुणोदय विद्यालय लाख(रायाजी) चे विज्ञान शिक्षक श्री गावंडे सर तसेच केंद्रप्रमुख सुनील पद्मावार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. वर्ग 5ते 7 व वर्ग 8ते 10या दोन गटात विद्यार्थ्यांनी पाणीबचत ,सौर ऊर्जा, लेझर सेक्युरिटी ,वॉटर एटीएम ,चुंबकाचे गुणधर्म ,ऑक्सिजन ज्वलनास मदत करते, यासारखे




नाविन्यपूर्ण प्रयोग सादर केले एकूण 42 प्रयोग दोन्ही गटात सादर झाले. विज्ञान शिक्षिका सुनीता जाधव व विज्ञान शिक्षक आनंद शर्मा यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन केले. वर्ग 5ते 7 या गटात कु. परी राठोड प्रथम क्रमांक, कु. परी बेलगव्हाणे व स्वरा ठाकरे द्वितीय क्रमांक ,कु. अवनी सीरसाट तृतीय क्रमांक तसेच प्रोत्साहन पर कु संस्कृती गावंडे तसेच 8ते 10 या गटामधून प्रथम क्रमांक कार्तिक राऊत व रोहन पावले ,द्वितीय क्रमांक सपना खेरे व सायमा पठाण, तृतीय क्रमांक अंश काळे तसेच या गटातून प्रोत्साहन पर संस्कृती कवटकर, संस्कृती डोंगरे ,ओम आडे ,क्रिश चव्हाण या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे क्रमांक पटकाविला सर्व विजयी स्पर्धकांचे मुख्याध्यापक डॉक्टर मंगेश अंबरकर व ज्येष्ठ शिक्षक गजानन इंगळे यांनी अभिनंदन केले. प्रदर्शनीच्या यशस्वी ते करिता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

## सणसर येथे नवरात्र दसरा सिमोलंगन पालखी सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर गावात सलग नऊ दिवस चालू असलेल्या नवरात्र उत्सव गावातील तुळजाभवानी मंदिर व जानाई देवीची मंदिरात चालू असताना या दोन्ही मंदिरात चालू असलेल्या तुळजाभवानी व जानाई देवीची नित्यनेमाने दोन वेळीच्या आरती करून पूजाअर्चा होत होती.या नवरात्रमध्ये सणसर गावातील स्वामी समर्थ केंद्रातील महिलांनी सात दिवस स्वामी समर्थाचा पाठ वाचन करून आदी कार्यक्रम करण्यात आला.

गुरुवारी सायंकाळी पाच वाजता पै संजय भाऊ निंबाळकर ऋतुराज निंबाळकर कविराज निंबाळकर तानाजी निंबाळकर यांच्या तुळजा भवानी मंदिरातुन पालखी गावातून वाजत गाजत सिमोलंगन खेळण्यासाठी गावाबाहेर घेऊन जाण्यात आली.परंपरेने सणसर गावचे माजी सरपंच विजय पाटील भागवत पाटील औदुंबर पाटील हे दरवर्षी सिमोलंगनासाठी लागणारा आपटा(सोनं) मोठ्या प्रमाणात ठेऊन तेथे पारंपरिक आराधी देवीची आरती करून गावकरी सोन्याची लुट केली जाते व गाव प्रदिक्षणा पूर्ण करून देवीची आरती केली जाते नंतर परिसरात सिमोलंगन साजरे केले जाते यासाठी सणसर गावातील जेष्ठ नागरिक युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी भागात खुरसाणी पीक बहरली

दरी खोरीत वसलेल्या अति दुर्गम डोंगराळ भागात दाट झाडी जंगल असल्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांचा कुजलेला पालापाचोळा, गवत ह्याचे मिश्रण जमिनीत मुरते आणि जमिनीचा पोत सुधारतो ह्याला कोणत्याही रासायनिक खताची गरज नसते.

डोंगराळ भागातील जमीन काळी कसदार व खीळवाड जरी असली तरी कोणतेही पीकाची जोमदार वाढ आणि त्यापासून भरघोस उत्पन्न मिळते. डोंगराळ भागातील वातावरण दमट व शुष्क असते. अशा वातावरणात खुरासाणी पीक उत्पन्न भरभरून देत असतात.

" पीक खुशीत डोलतया भारी
भरला आनंद समद्या शिवारी
बघुन पाचूचं रान
आमचं हरलं देह भान "



आज रानात गेल्यानंतर खान्देशी कवी. उत्तम कोळगावकर यांच्या कविताच्या ओळी आठवल्या शिवाय राहत नाही.

आज हेमंत ऋतूत निसर्गाच्या सान्निध्यात दरी, डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात खुरसाणी पीक कणसांनी, लहान दाण्यांनी भरून आली आहेत. साधारण वर्षा ऋतूमध्ये जुलै महिन्यात खुरसाणी या पिकाची नांगरणी करून पेरणी केली जाते.

आदिवासी भागात उडीद पीकाच्या शेतीत खुरसाणी पीकाची मिश्र शेती हे केली जाते. त्याला हळा म्हणतात. काही ठिकाणी खुरसाणीची स्वतंत्र शेती करतात खुरसाणी हे गळीताचं धान्य पीक डोंगर उताराव, सपाट माळरानावर पीवळ्या फुलांनी आता ऑक्टोंबर महिन्यात बहरून गेली आहेत. ही फुलं आकाराने सूर्य फुलाप्रमाणे लहान असतात. सूर्याचे सोनेरी किरण सकाळी पीकांवर पडले की फुल शोभून दिसतात एकेक मोठ्या खुरसाणी झाडाची उंची दोन,तीन फुटांपर्यंत वाढते झाडाला पंचवीस, तीस लहान, लहान फुलं येतात.फुलं झडून गेली की बीया परीपक्व होतात त्याला आदिवासी भागात (वंजणे) असे म्हणतात .

खुरसाण्याच्या कोवळ्या पानांची भाजी बनवली जाते.बीयांपासून तेल गाळतात व चटणी बनवतात ती कोनत्याही पाले भाजीत मिक्स केल्यावर भाजी रूचकर लागते आदिवासी भागात खुरसाणी पीक ह्या वर्षी पाऊस चांगला झाल्याने भरून आली आहेत.

**- श्री. सुभाष नारायण कामडी**
**(संशोधक)**

## तहसीलदाराची कारवाई: घटनेमुळे रेती तस्करांमध्ये खळबळ.अवैध रेती वाहतुकीचे वाहन जप्त

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

**रिसोड :** सेवा पंधरवाड़ा कार्यक्रमत व्यस्त आसल्याचा फायदा घेत् रेती तस्करानीअवैध रेती वाहतुक सुरु केली होती.मात्र रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यानी शासकीय कमजकाजत व्यस्त आसतानाही गुरुवारी (दी.३०)रात्रि धड़क कारवाई करुण रेती मांफियाना चांगलाच धक्का दिला .मिळालेल्या महितीनुसार,तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यानी माहिती मिळाली की , तालुक्यतील नेतंसा ते मांगुळझनक मार्गावर मोठ्या प्रमानात अवैध रेती वाहतुक सुरु आहे.त्यानूसार आदेशन्वये नायब तहसीलदार टी. डी. कुळमेथे यांच्या नेतृत्वखाली मंडळ अधिकारी संतोष लोखंडे , एस. एम . मोहळे , ग्राम महसुल अधिकारी पी. पी . बावस्कर व कर्मचारी घटनिस्थळी दाखल झाले .



तपासादरम्यान स्वराज कंपनी चा लाल रंगाचा ट्रैक्टर अवैध रेती वाहतुक करताना आढळला. चालकाला थांबविन्याचा प्रयत्न केला आसता त्याने ट्रैक्टर वेगाने पळवण्याचा प्रयत्न केला. मात्र पांडण व वळनदार रस्ता तसेच पूढ़े मार्ग बंद आसल्याचे चलकाने ट्रैक्टर तिथेच सोडूं न पसार होन्यात यश मिळवले.

सदर ट्रैक्टर मध्ये एक ब्रास रेती आढळली. चोकशीत समोर आले की,या ट्रैक्टर चा चालक मालक हा नेतंसा येतिल कृष्णा देवीदास खंदारे आसल्याची माहिती मिळाली .

घटनास्थळी पंचनामा करुण ट्रैक्टर जप्त करुण शिरपुर पोलिस ठाण्याला जमा करण्यत आला . तर रेती ही मांगुळझनक येथिल पोलिस पाटिल मंगलाबाई कल्याणराव झनक यांच्या सुपुर्द करन्यात आली .

तहसीलदार तेजनकर यांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली.

## जर्मनी देशात जाऊन योगेशने मिळवलेल्या यशाचा आम्हाला अभिमान - संतोष कदम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज)**

योगेश हणमंत कदम हा पाटण तालुक्यातील माईंगडेवाडी गावचा सुपुत्र सह्याद्री नगर चारकोप कांदिवली येथे वास्तव्यास असून प्रचंड मेहनती हुशार आणि जिद्दी युवा आहे. आपल्याला चांगले घडायचे असेल काहितरी नवीन करायचं असेल आणि उज्वल भविष्य घडवायचं असेल तर ते चांगलं शिक्षण घेऊनच होऊ शकत त्याची जिद्द आणि वडिलांची साथ त्याला लाभली त्याने शिक्षणासाठी थेट जर्मनी गाठली.खुप संघर्ष करत शिक्षण चालू ठेवलं बर्लिन या जर्मनीच्या



राजधानीत एमबीए इन एनर्जी मॅनेजमेंट ही पदवी प्राप्त केली आणि आपल्या भारत देशात आला.तेव्हा छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्या स्वराज्य पक्षाचे मुंबई युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी त्यांचा सत्कार केला.सोबत तानाजी कदम उपस्थित होते.योगेश कदम यांचे सर्वत्र कौतुक होत आहे स्वराज्य पक्ष सरचिटणीस धनंजय भाऊ जाधव यांनीही कौतुक केले.योगेशचा अनेक ठिकाणी सत्कार सोहळा मोठ्या प्रमाणात होत आहेत भविष्यात योगेश कदम हा युवकांसाठी प्रेरणा म्हणुन उभा राहील त्याच्या पुढील वाटचालीला खूप शुभेच्छा.तो नेहमी यशस्वी व्हावा त्याचा आम्हाला अभिमान आहे. असे यावेळी संतोष कदम यांनी म्हटले.

## लाखोच्या संखेने सामील व्हा एक दिवस समाजासाठी-संदीप पेंदोर

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी जितेंद्र खोडे**

राळेगाव : सकल आदिवासी समाजाचा आदिवासी आक्रोश क्रांती महामोर्चा दि.१० ऑक्टोबर २०२५ शुक्रवार दुपारी १२ वा.पोस्टल ग्राऊंड,समता मैदान यवतमाळ येथे आयोजित केला आहे.अभी नही तो कभी नही..

एक तिर एक कमान..
सभी आदिवासी एक समान..
अब सभी मिलके करेंगे ..उलगुलान उलगुलान ..

खरी आदिवासीयत दाखवायची योग्य वेळ आली आहे. दिवसेंदिवस आपल्यावरचा अन्याय, अत्याचार हा वाढतच आहे. आधी धनगर,आज बंजारा आपल्या आरक्षणात हिस्सा मागत आहे आणि आपण आज गप्पच बसलो तर उद्या इतर कोणी येऊन आपल्या मानगुटीवर बसेल म्हणून आजच जागे व्हा ! चूप बसाल तर उद्या आपल्या मुलांना भीक मागण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही. बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गात आरक्षण मागणीच्या विरोधात व इतर काही महत्वाच्या मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या आदिवासी आकोश मोर्चात लाखोंच्या संख्येने आपल्या मुला-बाळांसह सामील व्हा !

लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे..असे आवाहन करण्यात आले.



## "रामजीनगर शाळेचे हरितदूत शिक्षक किरणकुमार पाटील यांची कन्या शाळेत बदली.....

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी विजय काळे**

**सिल्लोड:-** सोयगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजी नगर शाळेतील लोकप्रिय शिक्षक किरणकुमार पाटील यांची बदली जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा सोयगाव शाळेत झाल्याने त्यांना निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या वेळी शिक्षकवृंद,विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाटील सरांनी शाळेत कार्यरत असताना केवळ अध्यापनच नव्हे तर विविध सामाजिक उपक्रमही राबवले.शाळेच्या परिसरात व गावात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून हरितगृह उपक्रम यशस्वी केला.तसेच



स्वच्छता अभियान,विद्यार्थ्यांना सामाजिक जाणिवा निर्माण करणारे कार्यक्रम,सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले.त्यामुळे शाळेचे शैक्षणिक व सामाजिक वातावरण उन्नत झाले.निरोप समारंभात सहकारी शिक्षक गोपाल चौधरी, रघुनाथ काटोल यांनी पाटील सरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, “त्यांच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांत शिस्त,चारित्र्य व संस्कार रुजले.

समाजाभिमुख काम करण्याची प्रेरणा त्यांनी दिली.” विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून आपली कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमात पाटील सरांना पुष्पगुच्छ,शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक शिक्षक गोपाल चौधरी यांनी नी केले तर आभार प्रदर्शन सहकारी शिक्षक रघुनाथ काटोले यांनी मानले.

यावेळी शिक्षक गोपाल चौधरी,रघुनाथ काटोले,समाजसेवक शंकर जेठ,राजु माळी,सोनू सोनवणे,भारत सोनवणे, महिंद्रा कोळी,ऋषिकेश गवळी,कृष्णा सोनवणे,मनोज आगे,दीपक,मुकुंदा बावस्कर,पिंटू राऊत,हर्षल गोसावी,शिवाजी राऊत,राजू इंगळे,राजू शेरकर,संतोष राऊत, आदींची उपस्थिती होती. ज्ञानेश्वर जाधव, अदिची उपस्थिती होती.